दैनिक
जनप्रभात
सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज

■(आष्टी) वर्धा ■मंगळवार, दि.२ जानेवारी २०२४ ■ वर्ष २ रे ■अंक १७९ ■पृष्ठ ६ ■मुल्य ५.०० ■मुख्यसंपादक : राहुल गजरे ■कार्यकारी संपादक : अवधूत शेंद्रे RNI NO : MAHAR/2020/82242

सुधीर मुनगंटीवारांकडून नागरिकांना इंग्रजी नववर्षाच्या शुभेच्छा



मुंबई : आगामी इंग्रजी नववर्ष २०२४ सर्व नागरिकांना सुख समाधानाचे, समृद्धीचे, आरोग्याचे, आनंदाचे आणि भरभराटीचे जावे अशा शब्दात सांस्कृतिक कार्य, वने व मत्स्यव्यवसाय मंत्री श्री सुधीर मुनगंटीवार यांनी राज्यातील जनतेला इंग्रजी नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. आगामी वर्षाच्या पहिल्याच महिन्यात श्रीरामजन्मभूमी मंदिरात रामलल्लाची प्राणप्रतिष्ठा होत असून श्रीरामाच्या आशीर्वादाने आणि विश्वगौरव पंतप्रधान श्री नरेंद्रभाई मोदी यांच्या नेतृत्वात भारत जागतिक पातळीवर तिसरी आर्थिक महाशक्ती याच वर्षी बनेल, असा मला विश्वास आहे, असे श्री सुधीर मुनगंटीवार यांनी म्हटले आहे. या नवीन इंग्रजी वर्षात आपल्या वैभवशाली संस्कृतीला पुन्हा उजाळा मिळो, राज्यातील वनसंपदेत अभिवृद्धी होवो आणि राज्य मत्स्यसंपदेतही समृद्ध होवो अशी सदिच्छा मी व्यक्त करतो, असे ना. श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी आपल्या संदेशात म्हटले आहे. राज्यातील जनतेवर श्री गणपतीचे आणि आई भवानीचे आशीर्वाद कायम राहावेत, अशी प्रार्थनाही त्यांनी केली आहे.

कायदा निर्मिती प्रक्रिया हा ज्ञान समृद्ध करणारा अनुभव: उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

वृत्तसंस्था ■ मुंबई



महाविद्यालयात कायदा शिकताना केवळ कायद्याची भूमिका समजते. मात्र, कायदा कसा तयार होतो. त्यामागचे तत्व काय, त्यामागे काम करणारी यंत्रणा कोणती याच्या माहितीसोबतच प्रत्यक्ष कायदा तयार करण्याचा अनुभव कायद्याचे शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना विधी विधान आंतरवासिता उपक्रमाच्या माध्यमातून मिळणार आहे. ज्ञान समृद्ध करणारी ही प्रक्रिया समजून घेणारा अविस्मरणीय अनुभव कायद्याचा अर्थ लावताना विद्यार्थ्यांना उपयोगी ठरणार आहे. त्यामुळे सहभागी झालेल्या आंतरवासिता विद्यार्थ्यांनी या संधीचे सोने करावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री तथा विधी व न्याय मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

राज्यात कायदेविषयक शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना विधी व न्याय विभागाच्या विधी विधान शाखेबाबत माहिती व्हावी व त्यांना प्रत्यक्ष अनुभव घेता यावा, त्यांच्या कार्य क्षेत्रातील करिअरसाठी व भविष्यातील वाटचालीसाठी उपयोग व्हावा यादृष्टीने विधी व न्याय विभागाच्या विधी विधान शाखेमध्ये दहा विद्यार्थ्यांकरिता सहा आठवड्यांचा आंतरवासिता उपक्रम राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. आजपासून सुरु झालेल्या 'विधी विधान इंटर्नशीप'च्या पहिल्या सत्राचे उद्घाटन उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे केले. यावेळी निवड झालेल्या आंतरवासिता विद्यार्थ्यांना उपमुख्यमंत्री तथा विधी व न्याय मंत्री श्री. फडणवीस मार्गदर्शन करताना बोलत होते. याप्रसंगी मंत्रालयातील उपमुख्यमंत्र्यांच्या दालनातील समिती कक्षात विधी व न्याय विभागाच्या प्रधान सचिव सुवर्णा केवले, विधी विधानचे सचिव सतीश वाघोले, सचिव तथा वरिष्ठ विधी सल्लागार अमोघ कलोती, उपमुख्यमंत्री यांचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी तसेच अन्य अधिकारी उपस्थित होते.

कायद्याच्या विद्यार्थ्यांसाठी असा उपक्रम सुरु करणारे महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य आहे असे सांगून उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, युवा पिढीचा थेट शासनाशी संबंध यावा, शासन - प्रशासन कसे चालते याची माहिती व्हावी आणि त्यांच्या नवनवीन संकल्पनांचा शासनालाही लाभ व्हावा या उद्देशाने मागील काळात सुरू केलेल्या सी. एम. फेलोचा लाभ शासनालाही झाला आहे. म्हणून विधी व न्याय विभागाचा मंत्री म्हणून विधी व न्याय विभागात अशा प्रकारची इंटर्नशीप सुरू करण्यासाठी प्रस्ताव येताच त्याला लगेच मान्यता दिली. हा स्तुत्य उपक्रम असून त्यासाठी त्यांनी विधी व न्याय विभागाचे अभिनंदन केले.

कायदा तयार करताना विविध गोष्टींचा विचार करावा लागतो. तो इतर कायद्याला अधिक्षेप करणार नाही, त्यात कोणतीही अस्पष्टता राहणार नाही, त्याचे नियम स्वयंस्पष्ट व्हावेत, याकडे लक्ष ठेवावे लागते. त्यामुळे ही प्रक्रिया समजून घेणे, त्याचा भाग होणे ही अतिशय महत्वाची बाब आहे.

केवळ कायदा समजून घेणेच नाही तर विधी व न्याय विभागाचे काम कसे चालते, त्यातील वेगवेगळया प्रकारची कामे, विविध मते-मतांतरांची सुद्धा माहिती विद्यार्थ्यांना मिळेल. एकूणच विधी व न्याय विभाग हा शासनाचे बॅक बोन आहे. आपल्या संविधानाने अतिशय उत्तम व्यवस्था उभी केली आहे. चेक ?ण्ड बॅलन्ससोबतच अधिकारांचे विकेंद्रीकरण देखील आहे. या व्यवस्थेत शिकण्यासारख्या खूप गोष्टी आहेत. त्या विद्यार्थ्यांनी शिकून घ्याव्यात.

६०० अर्जदारांमधून १० विद्यार्थ्यांची निवड यासाठी झाली आहे. या विद्यार्थ्यांना त्यांनी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांना येथे प्रात्यक्षिक करायला मिळणार आहे. केवळ पुस्तकी ज्ञान महत्वाचे नसून त्याचा योग्य वापर करता आला पाहिजे. अनेक अनुभवी अधिकाऱ्यांचे व्याख्यान येथे होणार आहे. याचा लाभ घेऊन जास्तीत जास्त बाबी शिकाव्यात.

या उपक्रमात जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना कसे सामावून घेता येईल याचाही विभागाने विचार करावा, अशा सूचना उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिल्या. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांनी सुद्धा हा उपक्रम सुरु केल्याबद्दल शासनाचे आभार मानले. सहभागी आंतरवासिता विद्यार्थ्यांमध्ये प्रियांका बोरा, प्रणिता गिरडेकर, सौरा पाटील, मिहीर मोंडकर, वैश्विक करे, भार्गवी मुंडे, सानिया सावंत, कृष्णा शेळके, आकाश प्याती, वेदांती जाधव या विद्यार्थ्यांचा समावेश आहे.यावेळी सचिव श्री. वाघोले यांनी हा उपक्रम सुरु करण्यामागची भूमिका विषद केली. कार्यक्रमाचे संचालन सहसचिव सुप्रिया धावरे यांनी, तर आभार सहसचिव मुग्धा सावंत यांनी मानले.

तीनखेडा येथे आगीत दोन घरे जाळून खाक

तिनखेडा येथील घटना;७ लक्ष रुपयांचे झाले नुकसान सिलेंडर चा झाला स्पोट;आगीचे कारण अद्याप अस्पष्ट





नरखेड ■ अतुल दंढारे

नरखेड तालुक्यातील तीनखेडा येथे सोमवारी दुपारी ३ च्या सुमारास गजानन वंजारी यांच्या घराला अचानक आग लागली आगीत घरातील सर्व साहित्य जळून खाक झाले. यात बाजूला असलेल्या गुलाब वंजारी यांचे घर सुध्दा जळाले असून यात घरातील धान्य, शेतीउपयोगी साहित्य, पैसे व सोन्या चांदीचे दागिने जळून खाक झाले. यात गजानन वंजारी यांचे अंदाजे ४ लक्ष ५० हजार रुपयांचे तर गुलाब वंजारी यांच्या घराचे २ लक्ष ५० हजार रुपयांचे नुकसान झाले असून एकूण ७ लक्ष रुपयांचे नुकसान झाले.यात घरातील सिलेंडरचा स्पोट झाला असून यात कोणत्याही प्रकारची जीवित हानी झाली नाही. या घटनेची माहिती पोलिसांना मिळताच पोलिस घटनास्थळी पोहचले व घटनेचा पंचनामा केला. त्याच प्रमाणे घटनास्थळी माजी सभापती नीलिमा सतीश रेवतकर यांनी घटना स्थळाची पाहणी करून घटनेची माहिती उपविभागीय अधिकारी पडोळे याना दिली व शासन स्तरावर जास्तीत जास्त आर्थिक मदत करण्याची विनंती केली. घटनास्थळी सरपंच सुरेश बारई, सतीश लोहकरे, प्रकाश नासरे, विनायक नागमोते तसेच पटवारी तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

१७ वे मराठी साहित्य संमेलनाचा ना. गिरीश महाजन यांनी तयारीचा घेतला आढावा

वृत्तसंस्था ■ साने गुरुजी साहित्य नगरी, अमळनेर (जि.जळगाव)



साने गुरुजी साहित्य नगरी, अमळनेर (जि.जळगाव) अमळनेर येथे होणाऱ्या ९७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासाठी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना निमंत्रण देण्यात आले असून संमेलनासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांनी येण्याचे आश्वासन दिले आहे. तसेच केंद्रीय मंत्री नितिन गडकरी हे देखील समारोपाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहणार असल्याचे जवळपास निश्चित झाले असल्याची माहिती संमेलनाचे स्वागताध्यक्ष तथा राज्याचे ग्रामविकास व पर्यटनमंत्री गिरीश महाजन यांनी आज दिली.

९७ वे मराठी साहित्य संमेलन २, ३ व ४ फेब्रुवारी २०२४ रोजी अमळनेर येथील पू.साने गुरुजी साहित्य नगरी, प्रताप महाविद्यालयात होत आहे. साहित्य संमेलनाच्या तयारीला वेग आला आहे. संमेलनाचे स्वागताध्यक्ष ना. गिरीश महाजन यांनी आज अमळनेर येथे जावून साहित्य संमेलनाच्या तयारीचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी संमेलनाच्या विविध ठिकाणी जावून प्रत्यक्ष पाहणी केली. आतापर्यंत झाले नाही असे संमेलन करून दाखायचं आहे, असा निर्धार त्यांनी यावेळी व्यक्त केला.

प्रताप महाविद्यालय,अमळनेर येथे झालेल्या बैठकीत बोलतांना ना.महाजन म्हणाले की, संमेलनाचा मी स्वागताध्यक्ष आहे. या संमेलनात कुठलीही कमी राहता कामा नाही, याची आपण दक्षता घेवू. आतापर्यंत झाले नाही असे संमेलन करून दाखायचं आहे, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला. सर्वजण आपल्या सोबत आहेत, कोणीही काळजी करु नये. तुम्ही सर्वजण कामाला लागा, असे आवाहन त्यांनी उपस्थितांना दिले. संमेलनासाठी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना निमंत्रण देण्यात आले असून मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी येण्याचे आश्वासन दिले असल्याचे सांगितले यावेळी त्यांनी बैठकीतून थेट ना.गडकरी यांना फोन लावून चर्चा केली. चर्चेनंतर गडकरी यांनी येण्याचे आश्वासन दिले असल्याने त्यांनी सांगितले.

या बैठकीला माजी आमदार शिरीष चौधरी, मराठी वाङ् ?मय मंडळ अमळनेरचे अध्यक्ष डॉ. अविनाश जोशी, उपाध्यक्ष श्यामकांत भदाणे, रमेश पवार, कार्यवाह नरेंद्र निकुंभ, शरद सोनवणे, कोषाध्यक्ष प्रदीप साळवी, कार्यकारी सदस्य प्रा. डॉ. पी बी भराटे, बन्सीलाल भागवत, स्नेहा एकतारे, संदीप घोरपडे, वसुंधरा लांडगे, मैय्यासाहेब मगर, प्रा. डॉ. सुरेश माहेश्वरी, प्रा. श्याम पवार, प्रा. शीला पाटील, अजय केले, बजरंग अग्रवाल यांच्यासह खान्देश शिक्षण मंडळाचे अध्यक्ष जितेंद्र झाबक, उपाध्यक्ष जितेंद्र देशमुख, माधुरी पाटील, विश्वस्त वसुंधरा लांडगे, कार्याध्यक्ष डॉ. अनिल शिंदे, कार्यउपाध्यक्ष प्रदिप अग्रवाल, सदस्य हरी वाणी, डॉ. संदेश गुजराथी, कल्याण पाटील, विनोद पाटील, निरज अग्रवाल, योगेश मुंदडे, चिटणिस प्रा. डॉ.ए.बी. जैन, सहचिटणिस प्रा. डॉ. डी. आर. वैष्णव, प्रा. आर. एम. पारधी, विनोद मधुकर पाटील तसेच नगरपालिकेचे मुख्याधिकारी प्रशांत सरोदे व श्री.गायकवाड उपस्थित होते.

हिंदवी स्वराज्याच्या वारसास्थळांवर केवळ भगवाच फडकणार : सुधीर मुनगंटीवार

अफजलखानाचे उदात्तीकरण करणारे अतिक्रमण हटविल्याबद्दल मुनगंटीवार यांचा चांदीची गदा देऊन सत्कार

वृत्तसंस्था ■ सांगली/ मुंबई



छत्रपती शिवरायांनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्याची वारसास्थळे, गड किल्ले यावरचे अतिक्रमण निश्चित हटवले जाईल आणि हिंदवी स्वराज्याच्या वारसास्थळांवर केवळ भगवाच फडकलेला दिसेल असे प्रतिपादन सांस्कृतिक कार्य, वने व मत्स्यव्यवसाय मंत्री श्री सुधीर मुनगंटीवार यांनी नुकतेच सांगली येथे केले.

ना. श्री सुधीर मुनगंटीवार शुक्रवारी सांगली दौऱ्यावर आले असता, प्रतापगडाच्या पायथ्याचे अफजलखानाचे उदात्तीकरण करणारे अतिक्रमण हटविल्याबद्दल श्रीशिवप्रतापभूमी मुक्ती आंदोलनाच्या वतीने त्यांचा चांदीची गदा देऊन सत्कार करण्यात आला, त्याप्रसंगी ते बोलत होते. सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री ना. श्री सुरेश खाडे आणि श्रीशिवप्रताप भूमी मुक्ती आंदोलनाचे निमंत्रक माजी आमदार श्री नितीन शिंदे यांच्या हस्ते हा सत्कार करण्यात आला.

ना. श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी पुढे सांगितले की औरंगजेब आणि अफजलखानासारखे परके आक्रमक आणि क्रूर अत्याचारी आमचे आदर्श कधीही होऊ शकत नाहीत. त्या क्रूर असुरांशी लढून हिंदवी स्वराज्याची पुनर्स्थापना करणारे छत्रपती शिवाजी महाराज आणि स्वराज्य रक्षणाकरता प्राणार्पण करणारे महाराणा प्रताप, राणी लक्ष्मीबाई हेच आमचे आदर्श आहेत. स्वराज्यशत्रूंचे उदात्तीकरण या देशात कधीही खपवून घेतले जाणार नाही. त्यामुळेच हिंदवी स्वराज्याची वारसास्थळे लवकरच अतिक्रमणमुक्त केली जातील आणि त्यावर भगवाच फडकलेला दिसेल, असे ते म्हणाले. माजी आमदार नितीन शिंदे यांनी प्रतापगड पायथ्याशी अफजलखानाचे जे उदात्तीकरण चालले होते, त्याविरोधात सातत्याने संघर्ष केला. मात्र मतपेटीचे लांगुलचालन करणाऱ्या तत्कालीन सत्ताधाऱ्यांनी त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केले.

सांगलीतील श्री प्रवीण कवठेकर यांनी अफजलखान वधाचे पोस्टर काढले होते, त्यांना तत्कालीन कॉन्ग्रेस सरकारने तुरुंगात टाकले होते, त्याची आठवण सांगत ना. श्री. सुधीर मुनगंटीवार म्हणाले की मी त्यांच्या अटकेविरोधात तेव्हा आवाज उठवला होता.सांगलीतील कच्छीभवन येथे संपन्न झालेल्या या सत्कार समारंभास माजी आमदार श्री दिनकर पाटील, श्रीमती नीता केळकर, ?ड. स्वाती शिंदे, श्री. पृथ्वीराज पवार, डॉ. भालचंद्र साठे, श्री. अविनाश मोहिते, श्री. ओंकार शुक्ल आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते.याप्रसंगी बोलतांना माजी आमदार श्री नितीन शिंदे तसेच ?ड स्वाती शिंदे यांनी विशाळगडासह अन्य गडकिल्लेही अतिक्रमण मुक्त करण्याची मागणी मांडली.

काहींच्या मेंदूत शिरलेला अफजलखानाचा व्हायरस काढण्यासाठी वाघनखे परत आणणार : सुधीर मुनगंटीवार

प्रतापगडाच्या पायथ्याशी स्वराज्यशत्रू अफजलखानाचे उदात्तीकरण करणारे अतिक्रमण तर हटवले आहे. मात्र काहींच्या मेंदूत अफजलखानाचा व्हायरस शिरला आहे. तो काढण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी अफजलखानाचा कोथळा काढण्यासाठी वापरलेली वाघनखे ब्रिटनहून परत आणणार आहे, असे ना. श्री. सुधीर मुनगंटीवार म्हणाले.

राज्यातील सर्वसामान्य माणसाचा विकास हेच ध्येय- मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

वृत्तसंस्था ■ ठाणे



आपल्याला काय मिळाले यापेक्षा आपण देशासाठी आणि समाजासाठी काय दिले, हे जास्त महत्वाचे आहे. पुढारी वृत्तपत्र केवळ बातम्या देत नाही, तर ते सामाजिक बांधिलकीनेही तितकेच चांगले काम करते. सामाजिक बांधिलकीची शिकवण धर्मवीर आनंद दिघे यांच्याकडून आपल्याला मिळाली. या शिकवणीनुसार मुख्यमंत्री म्हणून मी सामाजिक काम करीत आहे. राज्यातील सर्वसामान्य माणसाचा विकास हेच शासनाचे ध्येय आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे केले.

पुढारी वृत्तपत्राच्या ८५ व्या वर्धापन दिनानिमित्त गडकरी रंगायतन येथे आयोजित 'पुढारी युथ आयकॉन २०२४' या पुरस्कार वितरण कार्यक्रमात ते बोलत होते.यावेळी केंद्रीय मंत्री नारायण राणे, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, आमदार संजय केळकर, माजी महापौर नरेश म्हस्के, पुढारी वृत्तपत्राचे तुळसीदास भोईटे, विवेक गिरधारी, शशिकांत सावंत, आदी उपस्थित होते.मुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले, भारत हा जगातील सर्वात तरुण देश आहे. ही आपली शक्ती आहे. असे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी नेहमी सांगतात. संपूर्ण जगभरात भारताला नावलौकिक मिळत आहे. आजच्या तरुण पिढीला योग्य मार्गदर्शन व प्रोत्साहन दिल्यास आपला देश हा विकसित देश म्हणून ओळखला जाईल. त्या दिशेने केंद्र व राज्य शासनाचे काम सुरु आहे. चांगले काम करणाऱ्यांना योग्य वेळेत पाठीवर थाप मिळाल्यास त्यास अधिक ऊर्जा मिळते. ते अधिक चांगले काम करु शकतात. चांगले काम करणाऱ्यांना पुरस्काराने सन्मानित करणे, ही सुदृढ समाजाच्या दृष्टीने काळाची गरज आहे.

पद्मश्री प्रतापसिंह जाधव यांच्या नेतृत्वाखाली 'पुढारी' वृत्तपत्राची वाटचाल दमदारपणे सुरु आहे. चांगल्या व्यक्तींची नोंद घेऊन त्यांना सन्मानित करण्याचे उत्तम कार्य पुढारी करते. करोना काळातही पुढारीने उत्कृष्ट कार्य केले. पुढारी चॅनलच्या माध्यमातून चांगले काम सुरु आहे. अनेक सामाजिक प्रश्नांना वाचा फोडणारे, चांगल्या व्यक्तींच्या कामाचे कौतुक करणारे असे हे वृत्तपत्र आणि चॅनल आहे. विविध क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींचा गौरव चांगला समाज घडण्यासाठी आवश्यक आहे, असे सांगून ते पुढे म्हणाले की, केंद्रीय लघु उद्योग मंत्रालयाच्या माध्यमातून अनेक रोजगार निर्मिती होऊन लोकांना विविध प्रकारची कामेही मिळत आहेत. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजना, कौशल्य विकास, स्टार्टअप अशा विविध योजनांच्या माध्यमातून राज्य शासनही तरुणांना उद्योजक म्हणून घडविण्यासाठी प्रयत्नशील आहे. राज्याचा सर्वांगीण विकास, सर्वसामान्य माणसाचा विकास हे ध्येय समोर ठेऊन 'मेक इन इंडिया' चा ध्यास घेवून राज्य शासन काम करीत आहे. प्रधानमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली देश आत्मनिर्भर होतोय. तरुणाईला योग्य दिशा दिली जात आहे. आपली अर्थव्यवस्था जगभरात आघाडीवर येण्यासाठी मार्गक्रमण करीत आहे. आपले महाराष्ट्र राज्य भारताचे 'ग्रोथ इंजिन' आहे. 'डीप क्लिन ड्राइव्ह' अभियानात पुढारी वृत्तपत्रानेही पुढाकार घ्यावा, असेही आवाहन त्यांनी केले.

यावेळी केंद्रीय मंत्री श्री. राणे यांनीही मनोगत व्यक्त केले.यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते कला, क्रीडा, साहित्य, सामाजिक, प्रशासन अशा विविध क्षेत्रातील उल्लेखनीय काम करणाऱ्या युवांचा पुरस्कार देवून सन्मान करण्यात आला. यात प्रामुख्याने प्रशासनातील कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या आयुक्त डॉ.इंदू राणी जाखड, ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनुज जिंदल, पनवेल महानगरपालिका आयुक्त गणेश देशमुख यांचा विशेष सन्मान करण्यात आला. तर ठाणे पुढारी आवृत्तीचे मुख्य प्रतिनिधी दिलीप शिंदे, रायगड आवृत्ती ब्युरो चीफ जयंत धुळप यांचाही मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे आभार दिलीप शिंदे यांनी मानले.

तरुणाईने रक्तदान करून नववर्षाचे स्वागत करावे- मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

वृत्तसंस्था ■ ठाणे



धर्मवीर आनंद दिघे यांच्या काळापासून नववर्ष स्वागतार्थ सुरू केलेल्या मध्यरात्रीच्या रक्तदान शिबिरात आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वतःही रक्तदान करून एक आगळा वेगळा आदर्श निर्माण केला. आनंद दिघे यांनी घालून दिलेली शिकवण पुढे नेण्यासाठी ३१ डिसेंबरच्या मध्यरात्री मद्यधुंद होऊन नवीन वर्षाचे स्वागत करण्याऐवजी रक्तदान करून नवीन वर्षाचे स्वागत करावे, असा संदेश त्यांनी तरुणाईला दिला.

ठाणे शहरात दरवर्षी मध्यरात्रीचे रक्तदान शिबिर आणि राज्यस्तरीय रक्तकर्ण पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात येतो. यंदाही राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या अनेक रक्तदात्यांनी या कार्यक्रमात रक्तदान केले, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी माजी आमदार रवींद्र फाटक, माजी महापौर नरेश म्हस्के, सौ. मीनाक्षी शिंदे, हेमंत पवार, माजी नगरसेवक सुधीर कोकाटे, माजी परिवहन सभापती विलास जोशी, मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाचे विशेष कार्य अधिकारी मंगेश चिवटे, निखिल बुडजडे, स्वानंद पवार आदी उपस्थित होते.

रक्तदात्यांना मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते रक्तानंद पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. या क्षेत्रात काम करणारे अन्य मान्यवर संस्था आणि व्यक्तींचा या सोहळ्यात गौरव करण्यात आला. तसेच या कार्यक्रमात काही दिव्यांग बांधवांना कृत्रिम अवयवांचे आणि साहित्याचे वाटप करण्यात आले.

मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले की, संपूर्ण जगभरात अशा पद्धतीने नववर्षाचे स्वागत करणारा असा हा एकमेव कार्यक्रम असून गेली २९ वर्षे हा कार्यक्रम अव्याहतपणे सुरू आहे. रक्तदान हे श्रेष्ठदान आहे, असे आपण म्हणतो. काही वर्षापूर्वी नवरात्रीचे नऊ दिवस याच मैदानात असे महारक्तदान शिबिर आयोजित केले होते. त्या शिबिरात ११ हजारांहून अधिक दात्यांनी सहभाग घेतला. नवीन वर्षाचे स्वागत करताना अनेक तरुणांनी स्वतःहून पुढे येऊन रक्तदान केले याचे विशेष समाधान वाटत असल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले. तसेच या सोहळ्यात रक्तदान करणाऱ्या सर्व रक्तदात्यांचे, संस्थांचे, डॉक्टरांचे मुख्यमंत्र्यांनी विशेष आभार मानले. या रक्तदान शिबिरात रक्तदान करणाऱ्या ठाणे शहरातील सर्व वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना यावेळी सन्मानित करण्यात आले.

मुख्यमंत्र्यांनी यावेळी नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या. मुंबईसह महाराष्ट्रात सध्या 'डीप क्लिन ड्राइव्ह' सुरू असून 'सुंदर शहरे-स्वच्छ शहरे-हरित शहरे' ही संकल्पना राबवित आहोत. त्याचे सकारात्मक परिणाम आता शहरात जागोजागी दिसू लागले आहेत. आता हे अभियान राज्यभरात राबविण्यात येणार असून त्याचा शुभारंभ 'गेट वे ऑफ इंडियावर' करण्यात आला. मुंबईत आज १० ठिकाणी 'डीप क्लिन ड्राइव्ह' मोहीम राबविण्यात आली असून त्या मोहिमेशी १ लाख नागरिक प्रत्यक्ष जोडले गेले होते. आपण हे अभियान मोठ्या प्रमाणात राबवत असून त्याचे दृश्य परिणाम दिसू लागले आहेत.

तसेच गेल्या दीड वर्षात सरकारने प्रत्येक निर्णय सर्वसामान्य लोकांना डोळ्यासमोर ठेवून घेतला आहे. परदेशी गुंतवणुकीत राज्याने कर्नाटक, गुजरातला मागे टाकून पुन्हा पहिला क्रमांक मिळवला आहे. अनेक उद्योजक आपला व्यवसाय सुरू करण्यासाठी आजही महाराष्ट्राला पहिली पसंती देत आहेत. गतवर्षी दाओसमध्ये १ लाख ३७ हजार कोटींचे सामंजस्य करार केले असून त्यातील ८५ टक्के करारानुसार कामे सुरू झाली असून यंदाही राज्यात विक्रमी गुंतवणूक घेऊन येवू, असे यावेळी त्यांनी सांगितले. याक्षणी सर्वाधिक विकास प्रकल्प महाराष्ट्रात सुरु आहेत. त्यामुळे आगामी वर्ष देखील महाराष्ट्राचेच असेल, असा विश्वास मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी व्यक्त केला.

संपादकीय...

पुतिन-पंथीय की...

माणसाप्रमाणे वर्षदेखील आपापले नशीब घेऊन जन्मास येत असावे बहुधा. फरक इतकाच की माणसास नशीब बदलण्याची संधी असते. वर्ष या कालघटकाबाबत असे म्हणता येणार नाही.जगभरातील जवळपास ६४ देश २०२४ या एका वर्षात आपापल्या हद्दीतील लोकप्रतिनिधी निवडण्यासाठी मतदान करतील.. पण लोकशाहीचा विजय किती देशांत होईल ?माणसाप्रमाणे वर्षदेखील आपापले नशीब घेऊन जन्मास येत असावे बहुधा. फरक इतकाच की माणसास नशीब बदलण्याची संधी असते. वर्ष या कालघटकाबाबत असे म्हणता येणार नाही. उदाहरणच द्यावयाचे झाल्यास १९७९ ते १९८९ या दशकाचे देता येईल. सोव्हिएत फौजा अफगाणिस्तानात घुसल्यापासून सुरू झालेला या दशकाचा प्रवास, इराण-इराक युद्ध, बर्लिन भिंतीचे कोसळणे, सोव्हिएत रशियाचे विघटन इत्यादी अनेक महत्त्वाच्या भोज्यांस स्पर्श करून इंटरनेटच्या मायानगरीच्या जन्मापर्यंत येऊन थांबतो. आपल्याकडेही मुंबईतील गिरणी संप, इंदिरा गांधी यांची हत्या आदी अनेक कारणांनी हा कालखंड महत्त्वाचा ठरतो. अशा संस्मरणीय वर्षांच्या मालिकेत आजपासून सुरू होत असलेले २०२४ साल आपल्या आगळया विक्रमाने स्थान मिळवू शकेल. या आंग्लसंवत्सराची नोंद जगाच्या इतिहासात निवडणुकांचे वर्ष अशी केली जाईल. एक नव्हे, दोन नव्हे तर जगभरातील जवळपास ६४ देश या एका वर्षात आपापल्या प्रांतातील लोकप्रतिनिधी निवडण्यासाठी मतदान करतील. जगात सध्या हयात असलेल्या समस्त मानवांपैकी साधारण ५० टक्के मनुष्यप्राण्यांस, म्हणजे सुमारे २०० कोटी, आज सुरू होणाऱ्या वर्षात मतदार म्हणून एक वेगळे महत्त्व येईल. यातील काहींचे मतदान म्हणजे 'वरून कीर्तन आतून तमाशा' असेच असेल, हे खरे. म्हणजे रशिया. त्या देशाचे सर्वेसर्वा व्लादिमीर पुतिन यांनी स्वतःस तहहयात अध्यक्षपदी राहता येईल, अशी व्यवस्था केलेली आहे. त्यांच्या देशात तसे मतदान होतेच. पण मतदारांस पुतिन यांच्या मतपत्रिकेवर पसंतीची मोहोर उमटवण्याखेरीज दुसरा काही पर्याय नसतो. त्यामुळे पुतिन हे नेहमीच 'प्रचंड मताधिक्या'ने निवडून येतात. आताही त्यांचा आव्हानवीर अलेक्सी नावाल्नी हा रशियात दूर कोपऱ्यातील तुरुंगात खितपत आहे. तेव्हा पुतिन यांचा मार्च महिन्यातील निवडणुकांतील विजय निश्चित. पुतिन यांच्या प्रमाणेच बेलारूस, उत्तर कोरिया, सीरिया आदी काही देशांतील राज्यकर्तेही भाग्यवान. कारण पुतिन यांच्याप्रमाणेच त्यांनाही त्यांच्या विजयाची शंभर टक्के हमी आहे. या पुतिन यांच्या पावलांवर पाऊल टाकण्याचा मोह अनेकांस कसा होतो, हे आता नव्याने नमूद करावयाची गरज नाही. हे सत्य वगळता अन्य निवडणुकोत्सुक देशांची दखल घ्यायला हवी.यात उल्लेखनीय म्हणजे अमेरिका. जगातील ही खरी आणि बलाढय लोकशाही. पण सध्या तिची कीव करावी तितकी कमी. इंग्रजीत 'कॉट बिट्वीन डेव्हिल ॲण्ड द डीप सी' असा वाक्प्रचार आहे. अमेरिका सध्या अशी एका बाजूस दैत्य आणि दुसरीकडे खोल-पण मृतप्राय समुद्र अशा तावडीत सापडलेली आहे. जवळपास निश्चल, बधिर अशा विद्यमान अध्यक्ष बायडेनबाबांस निवडून द्यावे की नको त्या दिशेने अविचल, दुष्टबुद्धी ट्रम्पुल्यास मत द्यावे अशी ही गंभीर समस्या. एखाद्यास हृदरोग की अर्धागवात इतकाच पर्याय असावा तसे हे. या निवडणुकांचे निकाल अमेरिकेच्या प्रथेप्रमाणे ८ नोव्हेंबरास जाहीर होतील. चार वर्षांच्या खंडानंतर ट्रम्प पुन्हा मतपत्रिकेवर असतील. त्यांच्या पहिल्या निवडणूक निकालाचा तर शहाण्या भारतीयांनी धसकाच घेतलेला असणार. कारण तिकडे अमेरिकेत ट्रम्प निवडून येत असताना इकडे त्याच दिवशी आपण निश्चलनीकरण अनुभवले. दोन्हीही घटना अत्यंत बुद्धिमानच तशा. तेव्हा या वर्षी ८ नोव्हेंबरास ट्रम्प निवडून येतील अशी परिस्थिती असल्यास भारतीयांचाही श्वास रोखला जाईल, हे निश्चित. अमेरिकेची बलाढय लोकशाही आपला अध्यक्ष निवडत असताना आद्य संसदीय लोकशाही ग्रेट ब्रिटनही आपला पंतप्रधान निवडेल. त्या देशात जवळपास १४ वर्षे हुजूर पक्षाची सत्ता आहे. टोनी ब्लेअर आणि त्यांच्याकडून पंतप्रधानपदाची सूत्रे स्वीकारणारे गॉर्डन ब्राऊन यांच्यानंतर मजूर पक्षास सत्ता मिळालेली नाही. आपल्या सत्तापदाच्या जवळपास दीड दशकात डेव्हिड कॅमेरून, थेरेसा मे, बोरीस जॉन्सन, लिझ ट्रस आणि आता ऋषी सुनक या हुजूर पक्षीय पंतप्रधानांनी त्या देशाचा करून ठेवलेला विचका पाहता ब्रिटिश नागरिकांनी यावेळी मजूर पक्षास कौल दिल्यास आश्चर्य नाही. तसे झाल्यास हुजूर पक्षाची सद्दी संपवण्याचे पुण्य भारतीय वंशाच्या वगैरे सुनक यांच्या खाती जमा होईल.सुनक यांच्या शेजारील अनेक देशांतही यंदा निवडणुका होतील. समग्र युरोप, त्यातील ऑस्ट्रिया, बेल्जियम आदी देशांतही लवकरच निवडणुकांचे वेध लागतील. अफ्रिका खंडातही अनेक देश या वर्षात निवडणुकांस सामोरे जात असले तरी त्यांपैकी सर्वात मोठया आणि लोकशाही असलेल्या दक्षिण अफ्रिकेतील निकालाकडे जगाचे लक्ष असेल. याखेरीज आशिया खंडातील बांगलादेश, दक्षिण कोरिया, तैवान, इंडोनेशिया, पाकिस्तान आदी आपल्या शेजार-पाजारीही पुढील वर्षी निवडणुका आहेत. बांगलादेशाच्या विद्यमान पंतप्रधान शेख हसीना याही तशा हुकूमशहा म्हणाव्यात अशा. त्यांनीही आपल्या प्रतिस्पर्ध्याच्या मुसक्या आवळल्या असून यंदाच्या निवडणुकीत त्यामुळे काय होते पाहायचे. पुढील आठवडयात ७ जानेवारीला या देशात मतदान होईल. पाकिस्तानातील लोकशाहीविषयी बोलणेही व्यर्थ.द. कोरिया, इंडोनेशिया, तैवान या अन्य निवडणुका राजकीयपेक्षा आर्थिक आणि जागतिक कारणांसाठी महत्त्वाच्या. तैवानमधे कोण सत्तेवर येणार यावर चीन-तैवान आणि म्हणून चीन-अमेरिका संबंधांचे भवितव्य पणास लागेल. आताप्रमाणे स्वाभिमानी आणि म्हणून चीन-द्वेषी राजवट त्या देशात कायम राहिली तर तैवान हे पुढील युक्रेन असण्याची शक्यता दाट. तसे झाल्यास पुन्हा एकदा जागतिक शांततेस आव्हान मिळेल, हे निश्चित.आणि सरतेशेवटी अत्यंत महत्त्वाचे म्हणजे आपल्याकडेही निवडणुका होतील. याआधी २०१९ साली निवडणुकांची घोषणा १० मार्चला झाली. यंदाही मार्च महिना हा निवडणुकांच्या घोषणेचा असेल. गेल्या निवडणुकीत पाच वर्षे जुने नरेंद्र मोदी सरकार पुन्हा येईल किंवा काय, हा प्रश्न होता. या वर्षी तसे काही असणार नाही. याआधी ???२०१४ ??? साली 'इंडिया शायनिंग'च्या झगझगाटात तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी सरकारचा विजय असाच गृहीत धरला गेला होता. पण ते हरले. तथापि मोदी म्हणजे वाजपेयी नव्हेत हे सत्य मान्य होण्यास शिक्षित असण्याची देखील गरज नाही. त्यामुळे वाजपेयींस जे सहन करावे लागले तसे काही मोदी सरकारच्या बाबत होईल, असे मानण्याचे कारण नाही, हे खरे. पण खऱ्या लोकशाहीत काहीही गृहीत धरता येत नाही, हेही तेव्हढेच खरे. किंबहुना लोकशाहीचे खरेपण हे अनिश्चिततेतच आहे. ही अनिश्चितता संपून मतदारांना गृहीत धरण्याइतकी निश्चितता वातावरणात जितकी अधिक तितके लोकशाहीचे आक्रसणे अधिक. तेव्हा लोकशाहीस असे अशक्त करण्याची इच्छा कोणाच्याच मनात नसल्यामुळे या निवडणुका चुरशीच्या होण्यास सर्व लोकशाहीप्रेमी हातभार लावतील, यावर विश्वास न ठेवण्याचे तूर्त तरी काही कारण नाही. त्यात आपण म्हणजे तर 'लोकशाहीची गंगोत्री'! तेव्हा तिच्या शुद्धतेसाठी सर्वाचाच हातभार आवश्यक. या निवडणूक वर्षांची सांगता आपल्यापुरती महाराष्ट्रात होईल. अर्थात विद्यमान राम-लहरींवर आरूढ होऊन पुढील मार्गक्रमणा सोपी व्हावी या हेतूने केंद्राबरोबरच महाराष्ट्रातही निवडणुका घेण्याचा निर्णय होणारच नाही, असे नाही. तसे झाल्यास महाराष्ट्रातील जनता एकाच वेळी दोघांस निवडण्यासाठी मतदान करेल.अशा तऱ्हेने यंदा वर्षभर कोठे ना कोठे निवडणुका सुरूच असतील. जगात अनेक देशांत पुतिन वा पुतिन-पंथीयांचा प्रभाव वाढत असताना तो अधिक वाढणार की त्यास रोखण्यात काहींना तरी यश मिळणार हे आजपासून सुरू होणाऱ्या वर्षात दिसून येईल. म्हणून तर हे वर्ष अधिक महत्त्वाचे.

भारतरत्न अलंकृत व्यक्ती: भारतीय राजपत्रात प्रकाशित!

(भारतरत्न पुरस्कार स्थापना दिवस विशेष)...



भारतरत्न हा भारतातील सर्वोच्च नागरी सन्मान आहे. देशासाठी सर्वोच्च प्रतीचे काम करणाऱ्या भारताची कीर्ती जगभरात वृद्धीगंत करणाऱ्या व्यक्तीस हा सर्वोच्च नागरी सन्मान देऊन गौरविले जाते. अशा व्यक्तींनी उभी हयात यासाठी घालविलेली असते. अनेकांना तर हा सन्मान मरणोत्तर दिला गेला आहे. सेवा, कला, साहित्य, विज्ञान व विश्वशांती, मानव विकास, कारखानदारी इत्यादी क्षेत्रांतील लोकांना, सनदी सेवा बजावलेल्या व्यक्तींना व अन्य अतुलनीय कामगिरी बजावणाऱ्यांना, हा अमूल्य पुरस्कार देऊन गौरविले जाते. सदर ज्ञानवर्धक लेख श्रीकृष्णदास (बापू) निरंकारी यांनी वाचकांच्या सेवेत वाहिला आहे.... संपादक.

भारतरत्न पुरस्काराचा निर्णय इ.स.१९५४मध्ये तत्कालीन भारत सरकारतर्फे घेण्यात आला. दि.२ जानेवारी १९५४ रोजी भारताच्या राष्ट्रपतींनी त्यावर मान्यतेची मोहर उठवली. सन १९५५ साली कायद्यात काही बदल करून मरणोपरान्त भारतरत्न देण्याची सोय करण्यात आली. त्यानंतर १२हून अधिक जणांना मरणोपरान्त भारतरत्न दिले गेले आहे. सन २०१४मध्ये वरील क्षेत्रांबरोबरच क्रीडा क्षेत्रातही उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना या पुरस्कारात स्थान देण्यात आले. सन २०१५ सालापर्यंत ४१ जणांना हा पुरस्कार लाभलेला आहे. त्यात तीन नावे परदेशी व्यक्तींची आहेत. या पुरस्काराचे वैशिष्ट्ये व तो देण्यासंबंधीचे नियम भारत सरकारच्या राजपत्रात नमूद केले आहेत. दि.२ फेब्रुवारी १९५४ साली पहिला पुरस्कार डॉ.राजेंद्रप्रसाद यांच्या हस्ते दिला गेला. भारतरत्न हा शब्द नावाआधी लिहिण्याचा एक किताब म्हणून वापरता येत नाही. इ.स.१९९२ साली सुभाषचंद्र बोस यांच्या नावाची भारतरत्न पुरस्कारासाठी घोषणा करण्यात आली होती. परंतु नेताजींच्या मृत्यूचा कुठलाही पुरावा उपलब्ध नसल्याने व त्यांच्या कुटुंबीयांच्या विरोधामुळे त्यांचे नाव मागे घेण्यात आले.

प्राथमिक वैशिष्ट्ये: पुरस्कार एका पदकाच्या स्वरूपाचा असेल आणि त्यास भारतरत्न संबोधले जाईल, असे ठरले. हे पदक १.३७५ इंच आकाराच्या व्यासाचे असेल आणि दोन्ही बाजूला गोल कडा असतील. पदकाच्या शीर्षपटलाच्या मध्ये उगवलेला सूर्य असून त्याची किरणे कडेपर्यंत पसरलेली असतील. सूर्यबिंबावर 'भारतरत्न' देवनागरी लिपीत कोरलेले असेल. पदकाच्या खालील कडेवर पुष्पमाला कोरलेली असेल. पदकाच्या मागील बाजूवर मधोमध भारताचे राजचिन्ह कोरले जाईल व त्याच्या खालील बाजूच्या कडेवर 'सत्यमेव जयते' देवनागरी लिपीमध्ये कोरले जाईल. हे पदक ०.२५ इंच रुंदीच्या पांढऱ्या रंगाच्या फितीमध्ये बांधून पुरस्कृत व्यक्तीच्या गळयात घातले जाईल. हे पदक राष्ट्रपतींच्या हस्तेच घातले जाईल. भारतरत्न पुरस्काराने अलंकृत व्यक्तीचे नाव भारत सरकारच्या राजपत्रात प्रकाशित केले जाईल आणि राष्ट्रपतींच्या निर्देशाधीन रजिस्टरमध्ये नोंदवले जाईल. एखाद्या व्यक्तीला दिले गेलेले पदक काढून घेणे व त्या व्यक्तीचे नाव रजिस्टरमधून कमी करणे हे अधिकार राष्ट्रपतींना असतील. तसेच एकदा काढून घेतलेले पदक पुन्हा त्या व्यक्तीला परत करणे आणि त्याच्या नावाची रजिस्टरमध्ये नोंद करण्याचा आदेश देण्याचा अधिकारही राष्ट्रपतींना राहील. जात, व्यावसायिक प्रतिष्ठा, लिंगभेद या कशाचाही परिणाम या पुरस्काराची पात्र व्यक्ती ठरविताना होणार नाही. प्रत्येक वेळेला रद्द करण्याची व पुनर्नोंदणी करण्याची प्रक्रिया भारत सरकारच्या राजपत्रात प्रकाशित केली जाईल.

नवीन बदल: राष्ट्रपतींनी दि.८ जानेवारी १९५५ रोजी राजपत्रातून पदकासंबंधी काही नवीन बदल अधिसूचित केले. त्यातील प्रमुख मुद्दे खालीलप्रमाणे- राष्ट्रपतींच्या हस्ते त्यांच्या मुद्रेसहित पुरस्कार प्रदान केला जाईल. हे पदक पिंपळाच्या पानाच्या आकाराचे असेल. त्याची लांबी २.३१२५ इंच, रुंदी १.८७५ इंच व जाडी ०.१२५ इंचाची राहील. हे पदक काशाचे बनवले जाईल. याच्या दर्शनी बाजूवर ०.६२५ इंच व्यासाच्या सूर्याची प्रतिकृती कोरलेली असेल. मागील बाजूवर राजचिन्ह कोरले जाईल. सूर्य व घेरा प्लॅटिनमचा असेल. अक्षरांवर चांदीचा मुलामा असेल. दि.२६ जानेवारी १९५७च्या अधिसूचनेनुसार हे पदक चमकदार काशामध्ये बदलले आहे.

मेडलची आजची स्थिती: भारतरत्न मेडल ५.८ सें.मी. लांबीचे, ४.७ सेंमी. रुंदीचे आणि ३.१ मिमी. जाडीचे पिंपळाच्या पानाच्या आकाराचे बनविलेले असते. हे कासे धातूचे बनवलेले असते. त्याच्या वरील बाजूवर १.६ सेंमी. व्यासाची सूर्याची आकृती कोरली जाते, ज्याच्या खाली देवनागरी लिपीमध्ये 'भारतरत्न' कोरलेले असते. मेडलच्या मागील भागावर भारताचे राष्ट्रीय चिन्ह चार सिंहांची राजमुद्रा व आदर्श घोषवाक्य कोरलेले असते. सूर्य, राजचिन्ह व कडा प्लॅटिनमच्या आणि शब्द चमकदार पितळेचे बनवले जातात. हे मेडल पांढऱ्या रंगाच्या रिबीनीमध्ये ओवले जाते. कोलकत्याला असलेल्या टांकसाळीत हे मेडल बनवले जाते. शब्द प्लॅटिनमचे आणि चमकदार पितळेचे बनवले जातात. हे मेडल पांढऱ्या रंगाच्या रिबीनीमध्ये ओवले जाते. कोलकत्याला असलेल्या टांकसाळीत हे मेडल बनवले जाते.

२०१५साली दिले जाणारे स्मृतिचिन्ह पक्के करण्यात आले. या भारतरत्न पुरस्काराच्या चिन्हाचे स्वरूप म्हणजे पदकावर एका सोनेरी पिंपळपानावर एका बाजूला मधोमध सूर्याची प्रतिमा व तिच्याखाली भारतरत्न असे शब्द आणि पाठीमागच्या बाजूला देशाचे राष्ट्रीय चिन्ह- 'चौमुखी सिंहाची प्रतिमा' अशा प्रकारचे आहे. हा पुरस्कार मिळवणाऱ्यांना इतर कुठलीही विशेष पदवी किंवा मानधन वगैरे मिळत नाही. परंतु त्यांना इंडियन ऑर्डर ऑफ प्रेसिडेंसीमध्ये ७वे स्थान स्थान मिळते. हा पुरस्कार ज्या व्यक्तींना मिळाला आहे, त्यांच्या नावाआधी भारतरत्न हा शब्द उपाधीसारखा वापरायची मुभा नाही. हा पुरस्कार मिळणे खूप मानाचे समजले जाते, हे ध्यानी घ्यावे लागते.

!! भारतरत्न पुरस्कार स्थापना दिनाच्या समस्त भारतीयांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

श्रीकृष्णदास (बापू) निरंकारी.
पोटेगावरोड, गडचिरोली.

फक्त व्हॉट्सप- ९४२३७१४८८३.

पाटीवर...

श्री व सौ भांडतात
दारावर आमचीपाटी
हक्कांचा करी दावा
माझीच केवळ कोठी

विकोपा जाई विवाद
मनात धरलेली लाठी
अबोल मूक युध्दात
कपाळी पडली आठी

भाजी भरलेली वाटी
सजवली एकाचंताटी
संसारतसा दोघांचाही
सामंजस्य ही हातोटी

माझे नाव हवे पहिले
अल्पकाळाची रे कट्टी
स्नेहाळ बंधन बांधले
करायची चिरंतन गट्टी

मळमळ नसावी पोटी
साधी सरळ ती पाटी
डोळयावरी सत्ता पट्टी
भले असू द्या दाम्पत्य
माणसे बनतात हट्टी

उद्या जन्मता अपत्य
लढेलं का हक्कासाठी
घरा नको राज कारण
अनुभव साठवा गाठी

नावे न आई बापाची
पाटीवर कशास दाटी
किंमतीवाटते कुणास
जड जवाहीरची पेटी

- हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६

विमान वारी...

आकाशात
लहरणारे
विमान उगा
भिरभीरे
इंधन कधीतर
संपता
अंती जमिनीवर
उतरे

जमिनीचा स्पर्श होता
अहंकार सगळा सरे
पोकळ होते आभाळ
जाणीव सत्याची स्मरे

भुस्कन सुटून चालले
अंगात घुसलेले वारे
दुरुन सुंदर दिसणारे
डोळयांसमोर येई तारे

उंची वरती फिरताना
दिसे कस्पटासमसारे
स्वरूप जाणवले खरे
मिटे विमानाचे पिसारे

पोटात दुमडली चाके
रनवेवर हळूवार फिरे
अजस्त्र वेग मंदावता
रे मनाला वाटले बरे

बांधलेले पट्टे सोडता
सोडतो लाब सुस्कारे
धन्यवाद पायलूटला
उघडता एकदाची दारे

आपणचं वाहून न्यावे
आपले सामान पेटारे
हवाईसुंदरी स्मित करे
पुढल्यां प्रवासा भेटा रे

- हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६.

क्रांतिज्ञानपिठ शाळेच्या विद्यार्थांची निवड राज्यस्तरावर

आष्टी (श) ■ राजेंद्र खंडार



आष्टी : ५१वे जिल्हास्तरीय विज्ञानप्रदर्शन हिंगणघाट येथे क्रांतिज्ञानपिठ (इ मा) शाळा च्या विद्यार्थ्यानी प्रथम क्रमांक पटकावून त्यांची राज्यस्तरावर निवड झाली आहे.

विद्यार्थी- कु आश्लेषा न. ठाकरे व शिवम रा. कलंत्री यांचे वर्धा जिल्हाचे खासदार माननीय रामदासजी तडस व आमदार रामदासजी आंबटकर यांच्या हस्ते सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात आले. या दोन्ही विद्यार्थ्यांची राज्यस्तरावर निवड झाली आहे .हिंगणघाट येथील प्रदर्शनी मध्ये वर्धा जिल्ह्यातील सर्व तालुक्यातून एकूण ८८ मॉडेल होते त्यापैकी क्रांतिज्ञानपिठ च्या विद्यार्थ्यानी प्राथमिक गटातून प्रथम क्रमांक पटकावून शाळेचे व आष्टीचे नाव राज्यस्तरावर पोहचविले.

शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. ठाकरे मॅडम तसेच उपमुख्यद्यापिका वंदना लेकुरवाळे व मार्गदर्शन शिक्षक रझिक गुलाम ,निलेश घाटवाळे सर्व शिक्षक पल्लवी पाटील ,मोनिका ठाकरे ,विनया साबळे ,वैष्णवी काळे ,नयना शेटे ,सरला कुदुपले ,भाग्यश्री साबळे ,रोहिणी पाटील ,वर्षा नवलाखे,रोहिणी शहाणे , ,त्रुप्ति ककपुरे तथा सर्व कर्मचारीवर्ग कडून विद्यार्थ्यांचे खुप खुप अभिनंदन व राज्यस्तराकरितां शुभेच्छादेऊन विद्यार्थ्या चे कौतुक केले .

१ जानेवारी भीमा कोरेगाव शौर्य दिन म्हणून साजरा

कामठी ■ नंदू कोल्हे



कामठी ता प्र जानेवारी:-१ जानेवारी १८१८ साली झालेल्या भीमा कोरेगावच्या रंनसंग्रमात पेशव्यांच्या सैन्यविरुद्ध जिंकु किंवा मरू या भावनेशि २८ हजार पेशव्या सैनिकाना फक्त ५०० महार सैनिकांनी ठार मारुंन विजय मिळविला होता तेव्हा या वीर भीम सैनिकांच्या स्मरणार्थ आज कामठीत प्रोग्रेसिव्ह मूव्हमेंट कामठी वतीने १ जानेवारी भीमा कोरेगाव शौर्य दिन २०६वा महोत्सव वर्ष म्हणून मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला .

यानुसार जयस्तंभ चौक स्थित परमपूज्य डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळयाला प्रोग्रेसिव्ह मूव्हमेंट चे पदाधिकारी श्रीरामजी हटवार यांच्या हस्ते माल्यार्पण व दीपप्रज्वलन करून विशेष बुद्ध वंदना घेऊन भीमा कोरेगाव विजयस्तंभास मानवंदना वाहण्यात आले.

याप्रसंगी माजी नगरसेवक विकास रंगारी,प्रोग्रेसिव्ह मूव्हमेंट चे संयोजक प्रमोद खोब्रागडे,राजेश गजभिये,गीतेश सुखदेवें,तिलक गजभिये, अविनाश दहाट,कोमल लेंढारे,मनोज रंगारी, आशिष मेश्राम,राजन मेश्राम, गंगा वंजारी, कृष्णा पटेल,सलमान अब्बास ,संदीप रामटेके, दुर्गेश शेंडे, प्रशांत नागदेवें, जोशेफ घरडे आदी उपस्थित होते.

शौर्य दिनानिमित्त काटोलात भव्य रॅली



काटोल ■ प्रशांत पवार

आज १ जानेवारी २०२४ ला समता सैनिक दल दिशाभुमी नागपूर सुजाता डबासे यांच्या नेतृत्वा लील शोर्य दिनानिमित्ताने भव्य रॅली काटोल येथे काढण्यात आली. पंचशील विहार ते आंबेडकर चौक पर्यंत यामधे शाखा पारडसिंगा . ढवलापुर . परसोडी. लिंगा. येनवा. सावली घरतवडा रिधोरा. गवूरवडा. सेलगव. इंदरवाडा. येथील महिला सहभागी झाल्या होत्या नीलिमा बागडे अनिता वासनिक माधुरी डोंगरे जोस्ना सोमकुवर मीना पाटील धनश्री तिजारे शुष्मा सहारे मालती गोंडाने विद्या पाटिल संगीता पाटिल अर्चना मडके यांच्यासह शेकडो महिलानी सहभाग नोंदविला. रॅली शांततेत पार पडली.

नागपूर - मुंबई राष्ट्रीय महामार्ग जागो जागी बाधीत; सहा तास वाहतूक ठप्प

नविन मोटर वाहन कायदा रद्द करण्याच्यासाठी चालक संघटनेचे आंदोलन;गोंडखैरी परिसरात तीन तास वाहतूक ठप्प

दंगा नियंत्रण पथक (नागपूर ग्रामीण पोलीस) दाखल ;जागो जागी सहा तासानंतर वाहतूक सुरळित

काटोल ■ प्रशांत पवार



काटोल/प्रशांत पवार

देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये वाहन चालकांचा मोठा वाटा असताना त्यांच्यावर अन्याय करणारे कायद्याच्या निषेधार्थ नागपूर-अमरावती राष्ट्रीय महामार्गावर गोंडखैरी-हिंगणा टी पॉईंट व गोंडखैरी-सावनेर चौदामैल टी पॉईंटवर, टोल नाका, वडधामना, धामना तसेच बाजारगांव, शीवा फाटा येथील वाहनचालक संघटनेचे आंदोलन ठिक ठिकाणी सोमवार (१ जाने) रोजी सकाळी ९.३० ते २.०० वाजेपर्यंत सुरु होते. त्यात ये-जा करणाऱ्या ट्रक वाहनचालकांनी सहभाग घेत परिसरातील ट्रांन्सपोर्टर व ट्रक वाहनचालक संघटनेने निषेधार्थ गोंडखैरी टी पॉईंट व चौदामैल टी पॉईंट येथे रस्तारोको आंदोलन केले.

यापूर्वी अपघातातील दोषींना शिक्षा देण्यासाठी विविध कलमे अस्तित्वात आहे. शिवाय मोटार वाहन कायदा अस्तित्वात आहे. असे असताना देखील सुधारित हिट ॲण्ड रन कायद्यात नव्या कायद्यानुसार १० वर्ष कारावासाची शिक्षा, २ लाख ते १० लाख रुपयेपर्यंत दंड अशी तरतूद करून हा कायदा संसदेत पारीत करण्यात आला आहे. मात्र, अचानक अपघात झाले असता, अशोवळी मोठ्या वाहनाचे वाहनचालक नाहक भरडले जातात. त्यामुळे हा कायदा रद्द करण्याची मागणी करीत आंदोलकांनी नागपूर-अमरावती महामार्गावर गोंडखैरी परिसरात निषेधार्थ रास्तारोको आंदोलन केले.

नागपूर-अमरावती राष्ट्रीय महामार्गावर रास्तारोको आंदोलनाची माहिती मिळताच नागपूर ग्रामीण अप्पर पोलीस अधिक्षक डा? संदिप पखाले, सावनेर उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल मस्के, कळमेश्वर ठाणेदार यशवंत सोलसे, पोलीस उपनिरिक्षक दिलीप पोटभरे, पीएसआय मनोज टिपले सावनेर ठाणेदार रविंद्र मानकर , कोंढाळी पोलीस स्टेशन चे पंकज वाघोडे व धवल देशमुख व दंगा नियंत्रण पथक (नागपूर ग्रामीण पोलीस) दाखल होताच आंदोलकांनी पळ काढला. त्यामुळे वेग वेगळया ठिकाणी सहा तास थांबलेली वाहतूक जिल्हा वाहतूक पोलीस सावनेर व काटोल टीमच्या वाहतूक पोलीसांनी रस्ता सुरळित करुन महामार्ग मोकळा करण्यात आला.

रेती विना रखडले शासकीय विकास व घरकुलांचे बांधकाम

समुद्रपूर ■ अमोल झाडे

स्थानिक प्रशासनाकडून अवैध रेती विरोधात कारवाईची बडगा शासनाकडून तातडीने रेती उपलब्ध करून देण्याची सरपंच संघटनेची मागणी



समुद्रपुरः तालुक्यात शासनाकडून अद्यापही रेती डेपो खुल्ले केले नाही त्यातच महसूल विभागाच्या वतीने तहसिलदार कपिल हाटकर यांच्या मार्गदर्शनात अवैध रेती वाहतूकी विरोधात कारवाईचा बडगा उगाल्याने गाव खेड्यात सुरू असलेल्या शासकीय विकास कामे व घरकुलची कामे रखडली आहेत.मग शासनाकडून रेती नाही तर कामे करायची कशी असा प्रश्न गोर गरीब व शासकीय कंत्राटदारांना पडला आहे.

यामुळे संबंधी प्रशासनाकडून तातडीने याची दखल घेऊन रेती डेपो सुरू करुन रखडलेल्या विकास कामांना व घरकुलच्या बांधकामाला गती देण्याची मागणी सरपंच संघटनेच्या वतीने संबंधी विभागाला करण्यात आले आहे.आमदार समिरभाऊ कुणावार यांनी मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागातीच्या विकासकांसाठी भरघोस निधी उपलब्ध करून दिली असून अनेक कामांचे भूमिपूजन झाले मात्र हे कामे रेती अभाव हे रखडले आहे.या रखडलेल्या कामाला गती देण्यासाठी शासनाकडून कंत्राटदारांना रेती उपलब्ध करून देण्याची अंत्यंत आवश्यक आहे.हिंगघाट विधानसभा श्रेत्राचे कार्यसम्राट आमदार समिरभाऊ कुणावार यांनी हिंगणघाट विधानसभा श्रेत्रातील जवळपास प्रत्येक ग्रामीण भागाच्या विकासाला चालना देण्यासाठी मोठ्या प्रमाणात शासनाकडून निधी उपलब्ध करून दिली आहे.अनेक ठिकाणी विकास कामांचे भूमिपूजन सुध्दा पार पडले आहे.तर जल जीवन मिशन अंतर्गत अनेक गावात नविन पाणीपुरवठा योजनेचे काम सुरू आहे.तसेच शासनाकडून गोर गरीबांना मंजूर करण्यात आलेले घरकुलांच्या कामाला लागणारी रेती पाहिजे त्या प्रमाणात उपलब्ध नसल्याने अनेक ठिकाणी रेती अभावी विकास कामे तसेच घरकुलांचे बांधकाम रखडली आहे. अशातच समुद्रपुर तालुक्यात तहसिलदार कपिल हाटकर यांच्या मार्गदर्शनात महसूल विभागाच्या वतीने अवैध रेती वाहतूकी विरोधात कारवाईचा बडगा उगारला असल्याने या कामांसाठी रेती मिळणे अवघड झाले आहे.यामुळे काही ठिकाणी कंत्राटदारांकडून रेतीच्या ठिकाणी गिट्टीच्या चुरीचा वापर करण्यात येत आहे.मात्र या रेतीच्या ठिकाणी चुरीच्या वापरामुळे कामाचा दर्जा घसरण्याची शक्यता नाकारता येत नाही.स्थानिक लोकप्रतिनिधींनी ठेकेदारांना रेखडलेल्या कामा संबंधी विचारना केली असता ते रेती उपलब्ध नसल्याचे कारण समोर करून हात झटकून टाकत आहे.मात्र या रेतीच्या अभावामुळे गावात होणारी कामे रखडली असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्याप्त आहे.तरी शासनाकडून रेती डेपो सुरू करुन शासकीय विकास कामांसाठी व घरकुलच्या बांधकामा करीता तातडीने रेती उपलब्ध करून द्यावी अशी मागणी सरपंच संघटनेचे जिल्हाध्यक्ष धर्मेंद्र राऊत यांच्या मार्गदर्शनात सरपंच संघटनेचे जिल्हा सचिव सचिन गावंडे,जिल्हा प्रसिद्ध प्रमुख विलास नवघरे, विधानसभा अध्यक्ष किशोर नेवल, तालुकाध्यक्ष राजु नौकरकर, उपअध्यक्ष मुर्लिधर चौधरी, कोषाध्यक्ष जगदीश वरटकर आदिंसह तालुक्यातील सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्यांनी केली आहे.

बस स्टँन्ड येथुन महीलेच्या बँगेमधुन पैसे चोरुन नेणाऱ्या दोन महली अवघ्या एक तासात पोलीसांच्या ताब्यात



विरुळ (आ.) ■ विनोद महाजन

दिनांक ३०/१२/२०२३ रोजी सायंकाळी १७/३० वा. ते १७/४०वा. दरम्याण पुलगाव बस स्टँन्ड येथे फीर्यादी ही गाडीमध्ये बसत असतांना माझे अगदी मागे दोन महीला ह्या त्यांचे चेह-याला दुपट्टा बांधुन होत्या त्यांनी गाडीमध्ये चढतांनी भिड चा फायदा घेवुन माझे काखेमध्ये असलेली बँगमध्ये हात टाकुन त्यामध्ये असलेले ५००/- रुपयाचा १० नोटा असे एकुण ५०००/- रुपये असे माझे बँग मध्ये हात टाकुन काढुन चोरी केल्याचे रिपोर्ट वरुन अज्ञात दोन महीला यांचे विरुद्ध गुन्हा नोंद करुन तपासात घेतला. सदर गुन्हयाचे तपास सबंधाने गुन्हे प्रकटीकरण पथकाने तपास यंत्रना सर्तक करुन दोन अज्ञात महीला ह्या रेल्वे स्टेशन पुलगाव येथे असल्याची माहीती मिळताच त्यांना महीला पोलीसाचे मदतीने ताब्यात घेवुन विचारणा केली असता पुलगाव बस स्टँन्ड पुलगाव येथे चोरी केल्याचे कबुली दिली व त्यांचे ताब्यातुन चोरी केलेले नगदी ५०००/-रुपये हस्तगत केले. असुन त्यांची नावे १) सोनाली उदयभान उफाडे रा. रामेश्वरी रहाटे नगर टोली नागपुर २) सौ. नम्रता चैतराम उफाडे रा. रामेश्वरी रहाटे नगर टोली नागपुर असे आहेत.

सदर कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक श्री. नरुल हसन सा., अप्पर पोलीस अधिक्षक श्री. सागर कवडे सा.,उपविभागीय पोलीस अधिकारी पुलगाव ह्ए राहुल चव्हाण सा.पो.नि.श्री दारासिंग राजपुत, सा.पो.स्टे पुलगाव यांचे मार्गदर्शनात गुन्हे प्रकटीकरण पथक चे पो.हवा. चंद्रशेखर चुटे, रविंद्र जुगनाके, अमोल जिंन्दे,उमेश बेले,मपोशि दुर्गा चव्हाण यांनी केली आहे.

तायवाडे कॉलेजचे डॉ. राजेंद्र वाटाणे 'विदर्भ भूषण पुरस्कार (२०२३)ने सन्मानित



कोराडी ■ दिलीप येवले

सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात मागील पंचवीस अग्रगण्य असणा-या विद्याभूषण फाउंडेशन तर्फे देण्यात येणारा 'विदर्भ भूषण पुरस्कार (२०२३) हा डॉ. राजेंद्र वाटाणे यांना साहित्य संशोधनातील उल्लेखनीय योगदानाबद्दल प्रदान करण्यात आला. या प्रसंगी अतिरिक्त आयुक्त आदिवासी विभाग डॉ. रवींद्र ठाकरे, जागतिक वल्ड बैंकेचे सल्लागार डॉ. रमेश ठाकरे, संचालक डॉ. भूषण भस्मे व अन्य मान्यवर उपस्थित होते. डॉ. राजेंद्र वाटाणे हे तायवाडे कॉलेज महादुला-कोराडी येथे १९९६ पासून मराठी विषयाचे प्राध्यापक असून विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर येथे सचिव तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आणि गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली मराठी प्राध्यापक परिषदेच्या सचिव पदी कार्यरत आहे. त्यांची स्वतंत्र व संपादित २५ पुस्तके प्रकाशीत असुन ७५ संशोधनपर लेख प्रसिध्द झाले आहे ,तसेच त्यांच्या मार्गदर्शनात १६ विद्यार्थ्यांना आचार्य पदवी आणि २५ विद्यार्थ्यांना एम.फील.पदवी प्राप्त झाली आहे.अनेक सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमात त्यांचे मोलाचे योगदान राहिले आहे.

सरत्या वर्षाच्या पार्श्वभूमीवर गिरड पोलीसांची जिल्हा सीमेवर नाकाबंदी:पोलिसांकडून वाहनांची कडक तपासणी

समुद्रपूर ■ अमोल झाडे



समुद्रपुरः २०२३ सरत्या वर्षाला निरोप देताना कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक नुरुल हसन यांच्या आदेशानुसार गिरड पोलीस ठाण्याचे ठाणेदार सुनिल दहिभाते यांच्या प्रत्येक मार्गदर्शनात वर्धा व नागपूर जिल्ह्याच्या सीमेवर नाकाबंदी लावण्यात आली असुन याठिकाणून जाणाऱ्या येणाऱ्या प्रत्येक वाहनांची पोलिसांकडून कसुन तपासणी करण्यात आली आहे. वर्धा जिल्ह्यातील गिरड पासून अवघ्या २ किलोमीटर अंतरावर नागपूर जिल्ह्याची सीमारेषा असुन पोलिसांनी सणासुदीच्या काळात नागपूर जिल्ह्यातून अवैध दारू वाहतूक होत असल्याची दाट शक्यता असते यामुळे २०२३ सरत्या वर्षाला निरोप देताना कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या उद्देशाने याठिकाणून अवैध दारू वाहतूकी विरोधात गिरड पोलीस ठाण्याचे ठाणेदार सुनिल दहिभाते यांनी कारवाईचा बडगा उगारला असुन स्वता ठाणेदार सुनिल दहिभाते गिरड सिर्सी रस्त्यावरील जिल्हा सीमारेषा जवळी कुबडी इमली परीसात तळ ठोकून आहेत.यावेळी पोलिसांकडून याठिकाणावरून येणाऱ्या जाणाऱ्या प्रत्येक वाहनांची कडक तपासणी करून ठाणेदार सुनिल दहिभाते हे नागरिकांना २०२३ सरत्या वर्षाला निरोप देताना व नविन वर्ष साजरे करताना कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याचे आवाहन करीत आहे.यावेळी पोलिस कर्मचारी अनुप टपाले,असिम शेख, आदिंसह पोलिस सीमारेषा तळ ठोकून आहेत.

तोळोदी येथे भरली शालिकबाबा भक्तांची मांदियाळी: हजारो भाविक समाधीस्थळी झाले नतमस्तक

समुद्रपूर ■ अमोल झाडे

भक्तीमय वातावरणात शालिक बाबा प्रगट दिन सोहळा साजरा



समुद्रपुरः ताळोदी येथे संत शिरोमणी शालिकबाबा यांच्या प्रगट दिन महोत्सवाचे आयोजन २२ डिसेंबरपासुन करण्यात आले होते. शुक्रवारी २९ डिसेंबरला शालिक बाबा यांचा नाम जप करीत हजारो भाविक भक्त बाबांच्या समाधी स्थळ नसमस्तक झाले.१० वाजता गावात भव्य दिंडी सोहळ्यात परीसरातील भजन मंडळी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.टाळ मृदंगाच्या गजरात शालिकबाबा यांच्या जयघोषाने संपूर्ण तळोदी गाव दुमदुमून गेले होते. दर वर्षी प्रमाणे २२ डिसेंबरला या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. ७ दिवस चाललेल्या या महोत्सवात रोज श्रीमद् भागवत कथा सप्ताह व भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले. सकाळी काकडा, श्रीमद् भागवत कथा, सायंकाळी हरिपाठ, रात्री श्रीमद् भागवत कथा पार पडला असून यावेळी भाविकांची लक्षणीय उपस्थिती असते.सकाळी गावातील मुख्य मार्गाने भव्य दिंडी सोहळा आयोजित केला आहे. विविध गावातून आलेल्या भजनी मंडळी व भाविकभक्त या सोहळ्या सहभाग नोंदविला होता. काल्याचे कीर्तन झाले त्यानंतर महाप्रसाद वितरणाला करण्यात आला.या संपूर्ण महोत्सवाला हजारा भाविक भक्तांनी हजर लावली होती. या संपुर्ण महोत्सवाला येशस्वी करण्यासाठी श्री संत अवलिया शालिक बाबा प्रकट महोत्सव समिती व गावातील नागरिकांनी सहकार्य केले.

अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मागण्या योग्य महाराष्ट्र शासनाने तोडगा काढावा: आमदार दादाराव केचे

वर्धा ■ प्रतिनिधी

आर्वी विधानसभेच्या अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी आमदारांना घातले साकडे



आर्वी विधानसभेतील अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी आयटक व सिटू च्यावतीने ३० डिसेंबर रोजी संपाच्या २६ व्या दिवशी आमदारांना निवेदन देऊन शासनाकडे पाठपुरावा करण्यासाठी साकडे घालण्यात आले.अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मागण्या योग्य आहेत महाराष्ट्र शासनाने तोडगा काढावा असे प्रतिपादन– आमदार दादाराव केचे यांनी केले.

कोविड काळात देवदुता सारखे नागरिकांना मदत करणाऱ्या अंगणवाडी कर्मचाऱ्यांना इतर राज्याप्रमाणे मानधन मिळावे व सर्वोच्च न्यायालय यांनी दिलेल्या निर्णयाप्रमाणे ग्रॅज्युटी देण्यात यावे म्हातारपणा जगण्यासाठी दरमहा पेन्शन मिळावी ह्या अत्यंत महत्त्वाच्या मागण्या आहेत याबाबत मी महाराष्ट्र सरकारला पत्र देऊन तोडगा काढण्याची विनंती करणार आहे असेही आमदार दादाराव केचे यांनी सांगितले.

निवेदन देण्यासाठी अंगणवाडी कर्मचारी येणार असल्याची माहिती संघटनेचे नेते दिलीप उटाणे यांनी मला कळवल्यामुळे इतर दौरे रद्द करून आपल्या मागण्या समजून घेण्यासाठी उपस्थित आहे.४ डिसेंबर २०२३ पासून राज्यातील २ लाख अंगणवाडी कर्मचारी बेमुदत संपावर आहेत.आयटक राज्य सचिव कॉम्रेड दिलीप उटाणे व सीटू चे राज्य उपाध्यक्ष कॉम्रेड यशवंतराव झाडे यांच्या मार्गदर्शनाखाली वर्धा येथे अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे संप सुरू आहे.

मंगला इंगोले संगीता मनवर सुलभा तिरभाने मीना ढोके सीमा गडिया वंदना रेवतकर रेखा नाईक बेबी धारपुरे संगीता मलमकर रंजना सावरकर आर्वी मंगला इंगोले रुपाली बिजवे संगीता ठाकरे चंदा करनाके,सुलभा तिरभाने प्रतिक्षा भुरे,मीना ढोके संगीता मनहर आशा गळहाट ममता चव्हाण आष्टी सिमा गडीया. शिला जाधव.आशा लवणकर. शितल कोहळे. प्रज्ञा नाईके .अरुणा केचेसुनिता नेहारे. माला सातपूरे . उर्मिला पाठे. रशिका. आसोले संगीता मलमकर. चंद्रकला डोंगरे. रमकला लाडके. सविता. मनवर. अनामिका घागरे. तृप्ती बंनगरे, यांच्या नेतृत्वात निवेदन देण्यात आले यावेळी आर्वी विधानसभेतील आष्टी आर्वी कारंजा इत्यादी शेकडो अंगणवाडी कर्मचारी उपस्थित होते

पाणी फाऊंडेशनचा फार्मर कप शेतकऱ्यांसाठी सुवर्ण संधी: तहसिलदार कपिल हाटकर

समुद्रपूर ■ अमोल झाडे

गोविंद सभागृहात पाणी फाऊंडेशनचा फार्मर कप मार्गदर्शन शिबीराचे आयोजन



समुद्रपुरः पाणी फाऊंडेशनच्यावतीने फार्मर कप ही स्पर्धा दरवर्षी आयोजित केली जाते.ही स्पर्धा शेतकऱ्यांसाठी एक सुवर्णसंधी आहे. जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या स्पर्धेत सहभागी होऊन संधीचे सोने करावे असे प्रतिपादन तहसिलदार कपिल हाटकर यांनी गोविंद सभागृहात आयोजित फार्मर कप २०२४ अंतर्गत कार्यशाळ आयोजित करण्यात आले होते.यावेळी मुख्य मार्गदर्शक म्हणून पाणी फाऊंडेशनचे डॉ. अविनाश पोळ तर अध्यक्षस्थानी तहसिलदार कपिल हाटकर, प्रमुख पाहुणे म्हणून गटविकास अधिकारी रोशनकुमार दुबे,तालुका कृषी अधिकारी धनविजय ,विस्तार अधिकारी मुरार आदी प्रामुख्याने उपस्थित होते. फार्मर कप २०२४ साठी समुद्रपुर तालुक्याला सहभागी केल्याबद्दल तहसिलदार हाटकर यांनी जिल्हाधिकारी व पाणी फाउंडेशनचे आभार मानले. पाणी फाउंडेशनच्या प्रशिक्षणासाठी प्रत्येक गटातून पाच शेतकऱ्यांनी सहभागी होऊन ही गटशेतीची चळवळ मोठी करण्याचा प्रयत्न जिल्हाअधिकारी साहेब करीत आहे.त्यांच्या प्रयत्नाला आपल्या सर्वांच्या सहकार्याने यश मिळाले असे मत तहसिलदार कपिल हाटकर यांनी व्यक्त केले.यावेळी पाणी फाऊंडेशनचे डॉ.अविनाश पोळ यांनी फार्मर कप व गटशेतीचे महत्त्व सा- शेतकऱ्यांना उत्पादन खर्च कमी करून उत्पन्न वाढवायचे असल्यास एकत्र येऊन गटांच्या माध्यमातून काम करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले.तर गटविकास अधिकारी रोशनकुमार दुबे यांनी या उपक्रमात ७१ ग्रामपंचायतीत सरपंच,ग्रामसेवक, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य यांनी सहभागी घ्यावा असे आवाहन केले. यावेळी गेल्या वर्षी फार्मर कप मध्ये सहभागी होऊन यश संपादन केलेल्या शेतकरी गटाच्या प्रतिनिधीने आपले पाणी फाउंडेशनच्या संबंधी अनुभव व्यक्त केले.या शिबिरात मोहगांवचे सरपंच विलास नवघरे, गिरडचे सरपंच राजुभाऊ नौकरकर, पिंपळगाव येथील सरपंच किसनाजी शेंडे, वडगावच्या सरपंच वर्षाताई गणवीर सावरखेडा येथिल सरपंच नलिनीताई थुटे, उसेगाव येथिल सरपंच विलास तिंमाडे आदिंसह तालुक्यातील सरपंच ग्रामसेक, बचत गटाच्या महिला, शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

ग्रामपंचायत चिखली(निंबा) सरपंच सौ. मंगलागौरी विलास भोयर यांच्या अध्यक्ष तेत चिखली(निंबा) ग्रामपंचायत येते उपसरपंच पदी भारतीय जनता पार्टी समर्थित सौ. शिला नरेश गावंडे यांची निवड



कामठी ■ नंदू कोल्हे

ग्रामपंचायत चिखली(निंबा) सरपंच सौ. मंगलागौरी विलास भोयर यांच्या अध्यक्ष तेत चिखली(निंबा) ग्रामपंचायत येते उपसरपंच पदी भारतीय जनता पार्टी समर्थित सौ. शिला नरेश गावंडे यांची निवड झाली.

जिल्हा परिषद सदस्या सौ. अवंतिका लेकुरवाळे समर्थित २, माजी जिल्हा परिषद सदस्य विनोद पाटील समर्थित २ असे ऐकून ४ सदस्य एकत्रित येऊन,,सौ शीला नरेश गावंडे यांच्या विरोधात उपसरपंच पदाकरीता उम्मेवार दिला. सरपंच सौ. मंगलागौरी विलास भोयर यांच्या निर्णायक मतांनी सौ. शिला नरेश गावंडे १ मतांनी उपसरपंच पदी निवडून आल्या..झालेल्या निवडणूक मध्ये सरपंच सौ. मंगलागौरी विलास भोयर(काँग्रेस गट) व सौ. शिला नरेश गावंडे(भारतीय जनता पार्टी गट)येकत्र येऊन सोबत निवडणूक लढल्या हे विशेष त्यांच्या गटाचे ३ सदस्य व सरपंच निवडून आले होते. गावातील सर्व नागरिकांनी सरपंच व उपसरंच यांचे अभिनंदन केले..

फुट ओवर ब्रिज समस्या शिष्टमंडळाने खासदारांना दिले निवेदन

गोंडवानासह अन्य ट्रेनच्या थांब्याची केली मागणी

कामठी ■ नंदू कोल्हे



स्थानिक रेल्वे स्थानकावर वर्षभरापूर्वी उदघाटन करण्यात आलेला नवीन फूट ओव्हर ब्रिज प्रवाशांसाठी अतिशय गैरसोयीचा ठरत आहे. या गंभीर समस्येची माहिती खासदार कृपाल तुमाने यांना दिल्यानंतर प्रवासी १ संघटनेने नुकतेच लेखी निवेदन दिले असून पुरी-जोधपुर-पुरी आणि रीवा-इतवारी-रीवा एक्स्प्रेसला कामठी रेल्वे स्थानकावर थांबा मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त करताना थांबा दिल्याबद्दल खासदार -तुमाने यांचे आभार मानले. यावेळी रेल्वे स्थानक सल्लागार समितीचे सदस्य जयप्रकाश तिवारी, प्रमेंद्र वाही यांची प्रमुख उपस्थिती होती. रायगड निजामुद्दीन गोंडवाना एक्स्प्रेस क्रमांक १२४०९-१२४१० १ ला कामठी रेल्वे स्थानकावर थांबा देण्याची मागणी खासदारांकडे करण्यात आली. । याशिवाय कामठी रेल्वे स्थानकावरून जाणाऱ्या इतर मेल, एक्सप्रेस गाड्यांना येथे दोन मिनिटांचा थांबा देण्याची मागणी करण्यात आली. कामठी रेल्वे स्थानक हे कामठी व त्याच्याशी संबंधित ग्रामीण भागातील नागरिकांना स्थलांतरासाठी अतिशय सोयीचे असल्याचे सांगण्यात आले. याशिवाय कामठी येथील लष्करी छावणीतील सैनिक, खाणीत काम करणारे मजूर आणि असंख्य प्रवाशांसाठी रेल्वे प्रवासाच्या दृष्टिकोनातून कामठी रेल्वे स्थानक अत्यंत महत्त्वाचे आहे. नागपूर स्थानकातून प्रवास करणे इथल्या लोकांसाठी अत्यंत क्लेशदायक ठरते. नागपूरला जाण्यासाठी वेळ वाया जाण्याबरोबरच पैशांचीही नासाडी होते.

लोकांना अनेक समस्यांशी झगडावे लागत आहे. तर कामठी स्टेशन हे सर्वांसाठी सोयीचे आहे. मात्र आजही स्थानकावरून जाणाऱ्या अनेक महत्त्वाच्या गाड्यांना येथे थांबा नसणे हे दुर्दैव आहे. ज्याची परिसरातील असंख्य प्रवासी व नागरिकांकडून खंत व्यक्त होत आहे. हे लक्षात घेऊन महत्त्वाच्या गाड्यांना २ मिनिटांचा थांबा देण्यात यावा. कामठी

स्थानकात बांधण्यात आलेला नवीन फूट ओव्हर ब्रिज प्रवाशांसाठी त्रासदायक ठरत आहे. पूल अत्यंत लांब असल्याने वृद्ध, महिला, दिव्यांग व रुग्णांसाठी गैरसोयीचे ठरत आहे. हे पाहता एस्केलेटर आणि लिफ्टची नितांत गरज आहे. त्याचबरोबर जुन्या फूट ओव्हर ब्रिजच्या जागी एका प्लॅटफॉर्मवरून दुसऱ्या फलाटावर ये-जा करण्यासाठी नवीन सुविधा उभारणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रवाशांना दिलासा मिळेल. विभागीय रेल्वे ग्राहक सल्लागार समिती आणि परिमंडळात प्रतिनिधित्व देण्याची मागणी रेल्वे ग्राहक सल्लागार समिती आणि झोनमध्ये प्रतिनिधित्व मिळावे, या मागणीचे निवेदन प्रवासी संघटनेच्या वतीने खासदार तुमाने यांना देण्यात आले. हावडा ते नागपूर दरम्यान सर्वांत जुनी नोंदणीकृत ही प्रवासी संघटना असल्याचे सांगण्यात आले. असे असूनही, १५ ते २० वर्षांपासून असोसिएशनला झेडआरयूसीसी आणि डीआरयूसीसीमध्ये प्रतिनिधित्व देण्यात आलेले नाही. यासाठी असोसिएशनला निवेदन द्यावे, अशी विनंती करण्यात आली.

निवृत्तीनंतरही २०० शिक्षकगट विम्याच्या लाभापासून वंचित



वर्धा ■ प्रतिनिधी

जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांना गटविमा योजना लागू करण्यात आली आहे . निवृत्ती वेतन निधी अंतर्गत लेखे ठेवण्याची आणि प्रदानाची कार्यवाही केली जाते . वर्धा जिल्हा परिषद मध्ये सेवा देऊन निवृत्त झालेल्या आणि सेवेत असताना मृत्यू झालेल्या प्राथमिक शिक्षकांना निवृत्तीची दोन - तीन वर्षे होऊनही गटविमा प्रदान केले जात नाही . २०० पेक्षा जास्त प्रकरणे प्रलंबित असल्याची तक्रार महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या वतीने करण्यात आली आहे . वर्धा जिल्हा परिषदेतून निवृत्त झालेल्या प्राथमिक शिक्षकांच्या गटविमा प्रदानाचे बाबत . शासन निर्देशाचे पालन होताना दिसत नाही . वर्धा जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभाग , वर्धा जिल्हा परिषद वित्त व लेखा विभाग , वर्धा जिल्हा कोषागार कार्यालय यांच्याकडून प्रकरणे निकाली काढण्याबाबत कमालीचे दुर्लक्ष होत आहे . असा आरोप समितीच्या वतीने करण्यात आला आहे . सद्यस्थितीत गटविम्याच्या प्रदानाचे प्रमाण केवळ २ टक्केच आहे . सेवानिवृत्ती पश्चात गटाविम्याचा परतावा न झाल्याची २०० च्या जवळपास प्रकरणे प्रलंबित आहेत . अशाच प्रकारची इतर अनेक प्रकरणे प्रलंबित आहेत . याबाबत चौकशी केली असता जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभाग , जिल्हा परिषद वित्त व लेखा विभाग आणि जिल्हा कोषागार कार्यालय या स्तरावरून विसंगत माहिती जाते त्यामुळे प्रकरणे निकाली निघत नाही . अनेक शिक्षकांनी पेन्शन अदालतमध्ये तक्रार करूनही कोणतीच कार्यवाही होत नाही . गटविमा प्रदानाची प्रकरणे निकाली काढून देय रक्कम प्रदीर्घकाळ अदा केली जात नाही . प्रकरण निहाय चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यासह सर्व सेवानिवृत्त शिक्षकांच्या गट विम्याची रक्कम तातडीने अदा करावी अशी मागणी लेखी निवेदनामधून करण्यात आली आहे . या निवेदनासोबत लाभापासून वंचित असलेल्यांची यादी देण्यात आल्याचे कळते .

नोकरीच्या शोधात तरुणांची भटकंती; वयोमर्यादा संपल्याने शिक्षक उमेदवार चिंतेत

कामठी ■ नंदू कोल्हे

कामठी (सं.). नोकरीच्या शोधात अनेकांनी वयोमर्यादा ओलांडली आहे, नोकरी नसल्यामुळे लग्न करणे कठीण झाले आहे. शासनाने पवित्र पोर्टल व पात्रता परीक्षेद्वारे खासगी शिक्षण संस्थांमध्ये गुणवंत शिक्षकांची नियुक्ती करावी, अशी मागणी होत आहे. त्याचबरोबर खासगी अनुदानित संस्थांमध्ये शासन शिक्षक भरती करत नसल्याने अडचणीत वाढ होत असून, त्यामुळे भविष्यातील शिक्षकांना नोकऱ्यांसोबतच उदरनिर्वाहाची चिंता सतावत आहे.

आज नाही तर उद्या नोकरी मिळेल या आशेने हजारो तरुण-तरुणींनी शासन निर्णयानुसार परीक्षा दिली आहे. तयारी करणारे जिल्ह्यातील अनेक तरुण आता चिंतेत आहेत. डी.एड, बी.एड करूनही नोकरी न मिळाल्याने अनेक तरुण-तरुणींना रोजगाराचा प्रश्न भेडसावत आहे. तर शाळा मोठ्या प्रमाणावर आहेत. मराठीसह इंग्रजी माध्यमांतून डी.एड आणि बीएड महाविद्यालयांतून डी.एड आणि बी.एड पदवीधारकांचे स्थलांतर झाले. गेल्या १५ वर्षात हजारो सुशिक्षित तरुण बेरोजगार झाले आहेत. जिल्ह्यात हा आकडा मोठा असूनही जिल्ह्यातील बहुतांश शाळांमध्ये रिक्त पदे भरण्यात आलेली नाहीत. वयोमर्यादा ओलांडण्याच्या भीतीमुळे त्यांना नोकरी मिळण्याची चिंता सतावत आहे.

आरपीआयच्या राज्यस्तरीय परिषदेला उपस्थित राहण्याचे आवाहन

कामठी ■ नंदू कोल्हे

कामठी. राज्यस्तरीय परिषदेच्या संदर्भात रविवारी जिल्हाध्यक्ष सुधीर शंभरकर यांच्या अध्यक्षतेखाली व कामठी तालुकाध्यक्ष मिलिंद कावळे, कामठी शहराध्यक्ष प्रदीप वासनिक यांच्या उपस्थितीत आरपीआय पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यांनी बैठकीत सांगितले की, आरपीआय चंद्रपूर जिल्हाध्यक्ष मोरेश्वर चंदनखेडे यांच्या नेतृत्वात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आरपीआय) च्या महाराष्ट्र राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन रविवार, ७ जानेवारी रोजी दुपारी १२ वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह, चंद्रपूर येथे करण्यात आले आहे, तर परिषदेत संविधान वाचवा, लोक वाचवा, असे आवाहन करण्यात आले आहे. जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आरपीआयचे राष्ट्रीय सरचिटणीस डॉ.राजेंद्र गवई संमेलनाचे अध्यक्षस्थान भूषविणार असून महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सुबोध बागमोडे संमेलनाचे उद्घाटन करणार आहेत.

भीमा कोरेगाव विजय दिवसानिमित्त भव्य पुष्पहार अर्पण कार्यक्रम



कन्हान ■ नंदू कोल्हे

कन्हानः १ जानेवारी १८१८ रोजी ५०० महार योद्धे २८,००० पेशवाई सैनिकांशी लढले आणि भीमा कोरेगावच्या रणांगणावर विजयी झाले. या प्रसंगी

संपूर्ण भारतभर, भीमा कोरेगाव गावात शौर्य दिवस विजयी दिवसाच्या स्मरणार्थ साजरा केला जातो.

आज सोमवार दि.१ जानेवारी रोजी रिपब्लिकन कल्चरल असोसिएशन, नागपूर, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने भीमा कोरेगाव विजय स्तंभ व विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथील विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून भव्य स्वागत करण्यात आले. कन्हान. या कार्यक्रमात विशेषतः दीक्षा भूमी स्मारक समितीचे अध्यक्ष व महाबोधी महाविहार बौद्ध गया मुक्ती चळवळीचे संस्थापक आदरणीय सुरेई ससाई यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. व सामुहिक अन्नदानाचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाचे आयोजक चंद्रशेखर भीमटे, चेतन मेश्राम, मनोज गोंडाणे, कैलास बोरकर, आनंद चव्हाण, नितीन मेश्राम, पृथ्वीराज चव्हाण, राजकुमार बागडे, अमोल मेश्राम, शैलेश दिवे, अभिजीत चांदूरकर, अश्वमेध पाटील, संजय गजभिये, कांबळे, कांबळे, कांबळे आदी उपस्थित होते. अभिवादन कार्यक्रमात समता सैनिक दल.प्रमिला घोडेश्वर, सिंधू वाघमारे, सारिका धारगावे, माया चिमणकर, वैशाली थोरात, समता सैनिक दलाचे पदाधिकारी व रिपब्लिकन कल्चरल असोसिएशनचे पदाधिकारी व कार्यकर्ते व बौद्ध अनुयायी उपस्थित होते.कार्यक्रमाचे संचालन चेतन मेश्राम यांनी तर आभार प्रदर्शन रोहित मानवटकर यांनी केले.

मस्के भाजप व्यापारी सेलच्या कामठी शहराध्यक्षपदी निवड

कामठी ■ नंदू कोल्हे



कामठी. उमेश मस्के यांची कामठी भाजप शहर व्यापारी सेलच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आल्याची घोषणा भाजपने केली. भाजप व्यापारी सेलचे समन्वयक रवी गोयल यांच्या संदर्भात त्यांची नियुक्ती करण्यात आली होती.

भाजप व्यापारी सेलचे प्रदेशाध्यक्ष विक्की कुकरेजा व माजी विदर्भ संयोजक विवेक मंगतानी यांनी त्यांच्या नियुक्तीबद्दल त्यांचे अभिनंदन करताना व्यापारी क्षेत्रात व सत्ता व संघटनेत अधिक चांगले काम करणार असल्याचे सांगितले.

स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणारे उमेश मस्के संघटन मजबूत करण्यासाठी अधिक चांगले काम करतील. ते सर्वसामान्यांमध्ये लोकप्रिय आहेत. त्याच्या संघटनात्मक अनुभवांचा आम्हा सर्वांना फायदा होईल. या यशाबद्दल उमेश मस्के यांनी भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, आमदार टेकचंद सावरकर, जिल्हाध्यक्ष सुधाकर कोहळे, जिल्हा सरचिटणीस अनिल निधान, जिल्हा कोषाध्यक्ष अजय अग्रवाल, कामठी शहराध्यक्ष चंद्रशेखर तुप्पट यांचे आभार मानले आहेत.

दिव्यांगासाठी 'मोबाईल शॉप ऑन ई-व्हेईकल'; योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

नागपूर ■ दिलीप येवले

नागपूर,दिलीप येवले-: दिव्यांग व्यक्तींना स्वावलंबी होण्याच्या दृष्टीने हरित उर्जेवर चालणाऱ्या पर्यावरणस्नेही फिरत्या वाहनावरील दुकान (मोबाईल शॉप ऑन ई-व्हेईकल) मोफत उपलब्ध करुन देण्याबाबतची योजना शासनाने लागू केली आहे. या योजनेच्या अंमलबजावणी महाराष्ट्र दिव्यांग वित्त व विकास महामंडळाच्या स्तरावरुन सुरु आहे. ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी ४ जानेवारीपर्यंत मुदत देण्यात आली आहे. या योजनेचा लाभ अधिकाधिक दिव्यांग व्यक्तींनी घ्यावा, असे आवाहन महामंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

सुविधा उपलब्ध करुन रोजगार निर्मितीस चालना देणे, दिव्यांग व्यक्तींचे आर्थिक, सामाजिक पुनर्वसन करणे. सर्वसामान्य व्यक्तींप्रमाणे दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या परिवार, कुटुंबासमवेत जीवन जगण्यास सक्षम करणे असा योजनेचा उद्देश आहे.योजनेचा लाभ गरजू दिव्यांग व्यक्तींना मिळण्यासाठी अर्जदार नावनोंदणी (अर्ज) करण्यासाठी पोर्टल ३ डिसेंबर रोजी सुरू करण्यात आले असून दिव्यांग व्यक्तींकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यासाठी https://evehicleform.mshfdc.co.in ही लिंक उपलब्ध करून देण्यात आली आहे.

एक जानेवारीपासून दर सोमवारी ईबीसी सवलत अर्ज तपासणी कार्यक्रम

नागपूर ■ दिलीप येवले

सन २०२३.२४ या वर्षाकरिता ईबीसी अर्जाची तपासणी कार्यक्रम जाहीर करण्यात आला असून रवी नगर परिसरातील शिक्षण विभागाच्या लेखाधिकारी कार्यालयात ही तपासणी होणार आहे. दर सोमवारी संबंधितांनी याचा लाभ घ्यावा,असे आवाहन लेखाधिकारी शिक्षण विभाग यांनी केले आहे.शिक्षण विभागाने या संदर्भात जारी केलेल्या एका पत्रकामध्ये एक जानेवारी ते १५ मार्च या कालावधीमध्ये दर सोमवारी नागपूर शहर व ग्रामीण भागातील अर्जाची तपासणी केली जाणार आहे.नागपूर ग्रामीण व शहर विभागातील कनिष्ठ उच्च माध्यमिक वरिष्ठ महाविद्यालय व सर्व वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्राचार्य व मुख्याध्यापकांनी या प्रक्रियेची नोंद घ्यावी. योग्य तपासणी केलेले अर्ज पाठवावे, असे आवाहन शिक्षण विभागाने केले आहे.नागपूर जिल्ह्यातील अनुदानित, विनाअनुदानित सर्व कनिष्ठ महाविद्यालय वरिष्ठ महाविद्यालय वैद्यकीय महाविद्यालय व विद्यापीठ शाखा यातील विद्यार्थ्यांचे शुल्क सवलतीच्या अर्ज तपासण्याची ही प्रक्रिया १५ मार्चपर्यंत सुरू राहील. आठवड्याच्या प्रत्येक सोमवारी अर्ज तपासणी करण्यात येईल, याची नोंद घेण्याचे आवाहन केले आहे.

फ्रान्स येथील जागतिक कौशल्य स्पर्धेत सहभागी होण्याचे कौशल्य विभागाचे आवाहन

नागपूर ■ दिलीप येवले

व्यावसायिक शिक्षण व कौशल्य उत्कृष्टता स्पर्धा म्हणून ओळखल्या जाणारी जागतिक कौशल्य स्पर्धा यावर्षी फ्रान्स देशातील ल्योन शहरात होत आहे. या स्पर्धेमध्ये सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रामार्फत करण्यात आले आहे.

वेगवेगळ्या ५२ क्षेत्राशी संबंधित व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,सेक्टर्स स्किल कौन्सिल, विविध औद्योगिक आस्थापना,यांच्या सहकार्याने ही स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे. जिल्हा, विभाग, राज्य व देश पातळीवर या स्पर्धेसाठी उमेदवार निवडले जाणार आहेत.

या स्पर्धेमध्ये जिल्ह्यातील सर्व शासकीय खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था तंत्रनिकेतन महाविद्यालय अभियांत्रिकी महाविद्यालय प्रशिक्षण संस्था तसेच वेगवेगळ्या महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे या स्पर्धे संदर्भातील माहिती कौशल्य डॉट महास्वयम डॉट जीओव्ही डॉट इन या वेबसाईटवर उपलब्ध आहे अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास रोजगार उद्योजकता मार्गदर्शन केंद्र नवीन प्रशासकीय इमारत क्रमांक दोन दुसरा मजला सिव्हिल लाईन्स या ठिकाणी संपर्क साधावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र सुनंदा बजाज यांनी केले आहे.

सांगली येथील स्पर्धेत वर्धा जिल्ह्यातील खेळाडूंनी मिळविले सुयश

वर्धा ■ प्रतिनिधी



सांगली येथे राज्यस्तरीय शालेय स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या या स्पर्धेत वर्धा जिल्हा ज्युदो असोशिएशनच्या खेळाडुनी सहभाग नोंदवित चमकदार कामगिरी केली . शालेय राज्यस्तरीय ज्युदो स्पर्धाचे आयोजन सांगली क्रीडा संकुलमध्ये २१ ते २३ डिसेंबर दरम्यान करण्यात आले होते . वर्धा जिल्हा ज्युदो असोशिएशन मधील १४ वर्षा खालील गटात भक्ती रविन्द्र दुरबुडे हिने ३६ किलो वजन गटात द्वितीय स्थान प्राप्त केले . १७ वर्षाखालील गटात ज्ञाणेश्वरी दीपक मेश्राम हीने ३२ कीलो वजन गटात द्वितीय स्थान प्राप्त केले . मोनीका गेडेकर हीने ४४ किलो वजन गटात द्वितीय स्थान प्राप्त केले . रूचिता रविन्द्र शेंडे हीने ५७ कीलो वजन गटात तृतीय स्थान प्राप्त केले . शोर्य भगत यांने ४५ कीलो वजन गटात तृतीय स्थान प्राप्त केले . तसेच १ ९ वर्षा खालील गटात मानसी रविन्द्र गाठे हीने ३६ कीलो वजन गटात प्रथम स्थान प्राप्त केले . जागृती पवार हीने ४० कीलो वजन गटात तृतीय स्थान प्राप्त केले . दिशा काबंळे हीने ४८ कीलो वजन गटात तृतीय स्थान प्राप्त केले आहे . मानसी रविन्द्र गाठे यांची राजस्थान येथे होणा - या राष्ट्रीय स्पर्धेकरीता निवड झाली आहे . तसेच त्यांनी सांगली येथे वर्धा जिल्हयाचा नाव लौकीक केला आहे . प्रशिक्षक सर्व खेळाडूंनी मिळविलेल्या यशाबद्दल वर्धा जिल्हा ज्युडो असोसिएशनचे ओमप्रकाश पवार , चंद्रशेखर देशकर , जिवन कामडी , तिलक राणे , गौरव कामडी , अमोल बोडखे , दीपक मेश्राम , अतुल मदनकर , योगेश देवगीरकर , कुनाल शिंदे , साहील ठक दुर्गेश सहारे , धनश्री गाठे, या पदाधिकाऱ्यांनी आनंद व्यक्त केला . स्पर्धेत विजयी झालेल्या खेळाडूंनी आपल्या यशाचे श्रेय आई - वडीलांना क्रीडा शिक्षकांना दिले आहे.

भाजप आणि काँग्रेसने रामटेक लोकसभा निवडणुकीची तयारी सुरू केली आहे

कामठी ■ नंदू कोल्हे



कोणाचा बोजा पडणार हे शोधण्यासाठी विविध सर्वेक्षण संस्थांनी संशोधन सुरू केले आहे;भाजप आणि काँग्रेस दोघेही नवीन आणि तरुण उमेदवार उभे करू शकतात

कामठी लोकसभा निवडणुकीची देशभरात सर्वच पक्षांनी तयारी सुरू केली असून, रामटेक लोकसभा मतदारसंघासाठी गल्लीबोळ, गल्लीबोळ आणि राजकीय वर्तुळात वातावरण तयार होत आहे. लोकसभा निवडणुकीत सक्षम उमेदवार कोण याची चर्चा प्रमुख राजकीय पक्षांमध्ये सुरू झाली आहे. काँग्रेस आणि भाजपने सर्वेक्षण संस्थेच्या माध्यमातून विजयी उमेदवारावर शरसंधान सुरू केले आहे. भाजपकडून किरपाल तुमाने, राजेश रंगा री, राजू पारवे, सुधीर पारवे, अरविंद गजभिये यांची नावे चर्चेत आहेत, तर काँग्रेसकडून किशोर गजभिये, कुणाल राऊत आणि रश्मी बर्वे यांची नावे चर्चेत आहेत.

विद्यमान खासदार किरपाल तुमाने हे शिवसेनेचे शिंदे गट्टा आहेत.रामटेक लोकसभा जगेवार किंवा गट्टेचा ठावठिकाणा कुठेच दिसत नाही.भाजप युतीमुळे दोन्ही निवडणुका शिवसेनेने जिंकल्या.तुमणे यांना प्रसिद्धी मिळाली असती पण यावेळी पुन्हा भाजप तुमाने यांच्यावर विजय मिळवेल. शक्यता कमी असल्याचे दिसते. तिन्ही राज्यांमध्ये भाजपच्या विजयाने भाजप अधिकाधिक नवीन आणि तरुण उमेदवारांवर विजय मिळवणार असल्याचे संकेत दिले आहेत.किंवा, भाजपचे राजेश रंगारी, अरविंद गजभिये, सुधीर पारवे, राजू पारवे हे लोकप्रिय चेहरे आहेत. प्रश्न पडतो, काय ? भाजप हिंदू दलितांऐवजी बौद्ध दलितांवर प्रयत्न करू शकेल का ? आतील सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, काँग्रेस हिंदू दलितांवर सट्टा लावण्याच्या विचारात आहे, त्यात जिल्हा परिषद अध्यक्ष रश्मी बर्वे यांचे नाव चर्चेत आहे, अशा स्थितीत भाजप बाजूला आहे. आम्ही संपूर्ण विदर्भात बौद्ध दलितांवर एक पेज सुरू करू शकतो आणि राज्यातील बौद्ध दलितांमध्ये सहानुभूती मिळवण्यासाठी योजना राबवू शकतो. ही योजना लागू झाल्यास भाजपमध्ये अरविंद गजभिये आणि राजेश रंगारी यांची लॉटरी लागू शकते. कारण राजेश रंगारी हे प्रदेश भाजप अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचे खास आहेत. तारी बावनकुळे निदान किंवा जगतासाठी त्यांच्या विशेष कारणासाठी प्रयत्न करू शकतात. राजेश रंगारी हे गेली २० वर्षे भाजपची सेवा करत असून गेल्या १५ वर्षांपासून महादुला पंचायतीचे अध्यक्षपद भूषवत कामठी, मौदा विधानसभा मतदार संघ व रामटेक सावनेर, उमरेड येथील जनतेच्या प्रश्नांना उत्तरे देत आहेत. जनता दरबार आणि विविद मध्यंतून विधानसभा मतदारसंघ. राजेश रंगारी हे रामटेक लोकसभा मतदारसंघातील राजकारणातील लोकप्रिय नेते आहेत. अरविंद गजभिये हे भाजपचे जिल्हा अनुसूचित जाती अध्यक्ष असल्याने त्यांचा दावा प्रबळ आहे. सध्याच्या परिस्थितीत रामटेकला लोकसभेपर्यंत जाग आली आहे, महायुत शिंदे आणि शिवसेनेमुळे भाजपला अर्धेच जाग आली आहे, त्यामुळे भाजपची सर्व सूत्रे यशस्वी होतील. सध्या लोकसभा निवडणुकीचे ढोल वाजले आहेत, भाजपने तयारी सुरू केली आहे, काँग्रेसनेही पूर्ण ताकदीची तयारी सुरू केली आहे.भाजपच्या सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, भाजपने किरपाल तुमाने राजुपार्वे, सुधीर राजुपार्वे यांच्यासाठी निवडणूक घेतली आहे. पारवे, अरविंद गजभिये आणि राजेश रंगारी यांच्यापैकी कोण विजयी उमेदवार ठरू शकतो, यासाठी पक्षाने प्रयत्न सुरू केले असताना, काँग्रेसनेही रश्मी बर्वे, किशोर गजभिये आणि कुणाल राऊत यांच्यावर विचारमंथन सुरू केले आहे.

कृषिपंपाच्या सौर जोडणीसाठी प्रधानमंत्री कुसुम योजना सौरपंपाचा लाभ घेण्याचे आवाहन

वर्धा ■ प्रतिनिधी

प्रतिनिधी/वर्धा

शेतक-यांच्या कृषिपंपाचे विद्युतीकरण सौरऊर्जेद्वारे करण्यासाठी स्वयंअर्थसहाय्य तसेच केंद्र शासनाच्या अर्थ सहाय्यातून प्रधानमंत्री कुसुम-ब योजना राबविण्यात येत आहे. शेतक-यांनी या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

शेतक-यांना दिवसा सिंचन करणे शक्य व्हावे यासाठी राज्यातील शेतक-यांना कृषि वापरासाठी पारेषण विरहित सौर कृषिपंप अनुदान तत्वावर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. योजनेंतर्गत ३, ५ व ७.५ एचपी क्षमतेचे सौर कृषि पंप ९० ते ९५ टक्के अनुदानावर उपलब्ध होणार आहे. यासाठी पात्र लाभार्थ्यांना पंपाच्या क्षमतेनुसार खुल्या प्रवर्गातील शेतक-याना १० टक्के आणि अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतक-यास ५ टक्के लाभार्थी हिस्सा भरावा लागणार आहे. यासाठी एसएमएस संबंधित शेतक-यास पाठविण्यात येणार आहे.

राज्य शासनाने या योजनेसाठी महाऊर्जास १ लाख ४ हजार ८२३ सौर कृषिपंपासाठी मान्यता दिली असून मान्यतेनुसार महाऊर्जामार्फत लोकसंख्यानुसार जिल्हानिहाय उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. सद्यस्थितीत सुमारे ७५ हजार ७७८ सौर कृषिपंप आस्थापित करण्यात आले आहे. महाऊर्जाने सदर योजना राबविण्यासाठी स्वतंत्र पोर्टल विकसित केले आहे. शेतक-यांना ऑनलाईन पोर्टलद्वारे अर्ज सादर करावे. पोर्टलवर कागदपत्रे अपालोड करणे, अर्जाची छाननी करणे, शेतक-यांना लाभार्थी हिस्सा भरण्यासाठी एसएमएस पाठविणे, लाभार्थी हिस्सा ऑनलाईन भरण्याची व पुरवठादार निवडण्याची शेतक-यांना मुभा देण्यात आली आहे, असे महाऊर्जाच्या जिल्हा व्यवस्थापकांनी कळविले आहे.

चालक मालकाच्या साठी नवीन कायदे करण्यात येत आहेत ते त्वरित रद्द करा

टायगर ऑटोरिक्षा चालक व जय संघर्ष संघटनेची मागणी

दै, जनप्रभात मराठवाडा
उपसंपादक ■ राठोड रामेश पांडित



नांदेडः- केंद्रीय मंत्री अमित शहा हे ड्रायव्हर मालकांसाठी नवीन कायदे करून कठोर सिक्सेस साठी ड्रायव्हरला दोषी धरून कायदा करत आहेत तो कायदा त्वरित रद्द करावा या मागणीसाठी संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी मार्फत देशाचे पंतप्रधान व गृहमंत्री यांना निवेदन देऊन केली आहे

आपघात घडल्यास जखमींना मृत्युच्या दारी सोडून पळून जाणे हे प्रत्येक मानवी मणाला पटण्यासारखे मुळीच नाहि. परंतु स्वतःचा जीव वाचवण्यासाठी धडपड करणे हा गुण प्रत्येक प्राणी मात्रा मधे जन्म जात असल्या कारणाने आणि आपल्या भारत देशा मध्ये दलित आणि आदिवासी यांच्यासाठी जशी कठोर कायद्याची तरतूद आहे. तशा एखाद्या कठोर कायद्याचे संरक्षण ड्रायव्हरला नसल्या कारणाने ड्रायव्हर हा केवळ स्वतःच्या जिवाच्या भितीने आपघात स्थळा वरुण पलायन करतो. करीता ड्रायव्हर सुरक्षा कायद्याची प्रथमतः अंमलबजावणी करणे आणि त्या नंतर हिट अँड रन या नवीन कायद्या मधे कारावासाचा कालावधी व आर्थिक दंड या मध्ये कमी करुण त्या नंतरच कायदा लागू करणे हि विनंती. ड्रायव्हर हा एक माणूस आहे. तो हैवान नाही' केंद्रीय गृहमंत्री मंत्री अमित शहा साहेब हे मोटार वाहन नियमात बदल करून नवीन काळा कायदा आणू पहात आहेत. जर कुठे ड्रायव्हर कडून ॲक्सिडेंट (अपघात) झाला व ड्रायव्हर घटना स्थळापासुन पळून गेला तर त्या ड्रायव्हरला १० वर्षांचा तुरुंगवास व ७ लाख रु. दंड करण्यात येईल आता मला एक सांगा गाडी बरोबर ड्रायव्हर व क्लिनर असे दोघे असतात व ड्रायव्हर हा काही जाणून बुजून ॲक्सिडेंट करत नाही. माणुसं मारत नाही साधं कुत्रा जरी आडवा आला तरी ड्रायव्हर त्याला वाचवण्यासाठी अतोनात प्रयत्न करतो मग तो माणसे कसा मारील नाही पब्लिक त्याला तुडवून त्यांचे बेहाल करतील. तर एवढ्यावरच न थांबता त्याला जिवे मारतील. आणी चुकून जर ॲक्सिडेंट झाला तर तो अपचातीत लोकांना वाचवण्यासाठी दवाखान्यात नेण्यासाठी पुढे सरसावला तर जमलेली गर्दी त्याला मोकळे सोडतील का ?

सर्व गोष्टींच्या भितीने कोणता असा ड्रायव्हर आहे कि तो स्वतःच्या हाताने मरण मागेल तो पळून जाण्याचाच निर्णय घेईल ना. ड्रायव्हर जर घटना स्थळी थांबला व त्याचे जिवीतास धोका झाला तर त्याला जबाबदार कोन. ? हि जबाबदारी केंद्रीय मंत्री अमित शहा व त्यांचे सरकार घेईल का? असे ड्रायव्हर विरोधी एकनाअनेक धोरण व नियम सरकार राबवत आहे त्यांना माहीत आहे की सर्व एकत्रित होतील पण ड्रायव्हर हि जात कधीच एकत्र होणार नाही. आणी आपण एकत्रित होत नाही

याचाच फायदा घेत सरकार चालक-मालकांना लुटणारे असे जीवघेणे कायदे करीत आहेत करीता सर्व ड्रायव्हर भावांनी एकत्रित येऊन संघटीत होऊन अमित शहा व सरकारचा हा काळा कायदा पारित करण्याआधीच एक जुटीने आवाज उठवून हाणून पाडला पाहिजे. व असे ड्रायव्हर बांधवांच्या जिवावर बेततील असे कायदे बनवण्यापुर्वीच हाणून पाडले पाहिजे तरच कुठे माझा चालक-मालक भाऊ जियंत व सुखी राहु शकेल. आज एकत्र आलो नाही लढलो नाही तर भविष्यात आपण आपल्या कुटुंबास वाचवू शकणार नाही. टायगर ऑटोरिक्षा चालक संघटना माहाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष अहेमद बाबा जिल्हा अध्यक्ष शिवाजी लांडगे, उपाध्यक्ष तयब खान,बालाजी शेजोळे, दिनेश राठोड, विक्रम राठोड, देविदास काचोळे , बालाजी ढोले , बसवराज बावगे , रावसाहेब थोरात आदींची उपस्थिती होती.

आय.पी.एस अधिकारी कमलेश मीना बीड मध्ये दाखल,आय.पी.एस अधिकारी पंकज कुमावत यांच्याकडूंन केज विभागाचा घेतला पदभार

दै, जनप्रभात मराठवाडा
उपसंपादक ■ राठोड रामेश पांडित



बीडः- केज उपविभागाचा कार्यभार सक्षमपणे सांभाळणारे आय.पी.एस अधिकारी पंकज कुमावत यांची नुकतीच मागील काही दिवसांपूर्वी मुंबईला बदली झाली होती. आता त्यांच्या जागी परिविक्षाधीन आयपीएस अधिकारी म्हणून कमलेश मीना यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्याकडे केज येथील उपविभागीय पोलीस अधिकारी या पदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यांच्यासह अधिकाऱ्यांना राज्य सरकारने नव्याने मागील काही दिवसापूर्वी नियुक्त्या केल्या होत्या. आयपीएस अधिकारी पंकज कुमावत यांनी परिविक्षाधीन कालावधी पूर्ण झाल्याने ते नियुक्तीच्या प्रतीक्षेत होते. मागील दोन वर्षांपूर्वी आय.पी.एस अधिकारी पंकज कुमावत यांचे सहाय्यक पोलीस अधीक्षक म्हणून त्यांची नियुक्ती झाली होती. दरम्यान केज उपविभागाला शिस्त लावण्याचे आणि गुन्हेगारांमध्ये त्यांनी चांगलाच वचक निर्माण करण्यांचे काम पंकज कुमावत यांनी केले. हैदराबाद येथे नुकतेच प्रशिक्षण पूर्ण केलेले आणि केजला नव्याने नियुक्ती झालेले कमलेश मीना यांनी यापूर्वी देखील सातारा जिल्हा पोलीस दलातील वाई पोलीस ठाण्यात तीन महिन्यांचा आय.पी.एस अधिकारी म्हणून पोलीस ठाण्याचा पदभार स्वीकारला होता. वाई पोलीस ठाण्याच्या त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक गुन्हे देखील उघडकीस आणले, तसेच समाजातील गुन्हेगारीचे प्रमाण रोखण्यासाठी आणि तरुणांमध्ये व्यसनाधीन कमी करण्यासाठी त्यांनी वाई पोलीस ठाण्याचे प्रभारी आय.पी.एस अधिकारी असताना देखील महत्त्वाचा पुढाकार घेवुन व्यसनमुक्तीचा अनोखा उपक्रम राबवला होता. पंकज कुमावतासारखाच धडाकेबाज कारवाया करण्यात कराव्यात अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

शालेय जीवनातच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास शक्य : गटविकास अधिकारी महेश डोके

शिरुर (पुणे) ■ शकील मनियार



शालेय जीवनातच विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास शक्य असल्याचे मत शिरूर तालुक्याचे गटविकास अधिकारी महेश डोके यांनी यशवंतराव चव्हाण कला व क्रीडा सांस्कृतिक महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी सेंट जोसेफ इंग्लिश मीडियम स्कूलच्या प्रांगणावर केले. कार्यक्रमाला गटशिक्षण अधिकारी अनिल बाबर,शिक्षण विस्तार अधिकारी बाळकृष्ण कळमकर,किसन खोडदे,एल डी काळे,रघुनाथ पवार,शिरूर तालुका मुख्याध्यापक संघाचे सचिव मारुती कदम,शिरूर तालुका क्रीडा संघटनेचे अध्यक्ष शरद दुर्गे,सेंट जोसेफ इंग्लिश मीडियम स्कूलच्या प्राचार्या नॅन्सी पायस, अखिल शिक्षक संघटनेचे अध्यक्ष शिवाजीराव वाळके,महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद पुणे ग्रामीणचे उपाध्यक्ष प्रा. जितेंद्रकुमार थिटे,प्राथमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष संतोषराव थोपटे,पदवीधर शिक्षक संघटनेचे अध्यक्ष अशोकराव कर्डिले,शिक्षक संघटनेचे अध्यक्ष सतीषराव पाचर्णे,निमगाव म्हाळुंगीचे प्राचार्य राजीव मांढरे व शिक्षण क्षेत्रातील मान्यवर मंडळी यावेळी उपस्थित होती.डोके पुढे म्हणाले की शिरूर तालुका संपूर्ण जिल्ह्यामध्ये शैक्षणिक क्षेत्रामध्ये अग्रेसर आहे ही निश्चितपणानं आपणां सर्वांसाठी अभिमानाची गोष्ट आहे शिरूर तालुक्यामध्ये शिक्षक करत असलेले काम कौतुकास्पद आहे याप्रसंगी तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी अनिल बाबर उपस्थितीतांना मार्गदर्शन करताना म्हणाले की विद्यार्थ्यांचा शारीरिक आणि मानसिक संतुलित विकास व्हायचा असेल शिक्षणेतर उपक्रम प्रभावीपणे राबवून आनंददायी शिक्षण देणे गरजेचे आहे त्या दृष्टीने आपण सर्वजण प्रयत्न करूयात शिरूर तालुक्यातील सरदवाडी,कवठे यमाई,न्हावरे, तळेगाव ढमढेरे,पाबळ या पाच बीटाचे यशवंतराव चव्हाण कला व क्रीडा सांस्कृतिक महोत्सवाचे यशस्वी नियोजन करण्यासाठी संगीत विशारद श्रीहरी मेंदरकर,ओंकार संगीत विद्यालयाचे संचालक गणेश मराठे, ?थलेटिक संघटनेचे अध्यक्ष कैलासराव खंडागळे,शामकांत चौधरी,किरण झुरंगे,सुनील जाधव,मल्हारी उबाळे,संतोष खताळ, दत्तात्रय शिंदे,सेंट जोसेफ इंग्लिश मीडियमच्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले या तालुकास्तरीय स्पर्धेचे उत्कृष्ट नियोजन शिक्षण विभागाच्या गट साधन केंद्राच्या साधनव्यक्ती संतोष गावडे,नागेश चाटे, संदीप क्षीरसागर,संदीप गोरडे,राहुल आवारे,संजना गावडे,स्नेहा खरबस यांनी केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुप्रसिद्ध निवेदक शहाजीराव पवार व दीपक सरोदे तर आभार शिक्षण विस्तार अधिकारी किसन खोडदे यांनी मानले.

महाराष्ट्रांचे गृहमंत्री देवेंद्र फडवणीस झाल्यापासून महाराष्ट्रांत गुन्हेगारी वाढली, सुप्रिया सुळेंचा हल्लाबोल

दै, जनप्रभात मराठवाडा
उपसंपादक ■ राठोड रामेश पांडित



पुणेः- उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस हे गृहमंत्री पदाची जबाबदारी सांभाळण्यास पूर्णपणे अपयशी ठरले आहेत. ते गृहमंत्री झाले तेव्हापासून महाराष्ट्रांत चांगलीच गुन्हेगारी वाढली अशी टीका बारामतीच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केली आहे. महाराष्ट्र पोलिसांच्या सातत्याने बदल्या करण्यात येत आहेत. पारदर्शकपणे काम करून दिले जात नाही. गेल्या १५ दिवसांपूर्वी केंद्र सरकारने गुन्हे विषयक नवं विधेयक मांडलंय. ज्यामध्ये फोन टायपिंग अधिकृत करण्यात आलीय. गृहमंत्रालय पूर्णपणे अपयशी ठरलंय असा दावाही सुप्रिया सुळेंनी केला आहे. त्या पत्रकार परिषदेत बोलत होत्या. सुप्रिया सुळे पुढे म्हणाल्या... अनेक वर्षापासून महाराष्ट्रांने देशाच्या समाजकारणात आंबेडकर कुटुंबीयांनी मोठे योगदान दिलंय वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांचे कामही चांगलेच आहे. लोकसभेच्या निवडणुकीसाठी महाविकास आघाडीचा फार्मूला ठरला आहे. त्यावर शिक्कामोर्तब होणे बाकी आहे अनेक महिन्यांपूर्वीच हा फार्मूला दिल्ली ठरला आहे. आमचा जागावाटपाचा निर्णय लवकरच होईल असेही सुप्रिया सुळे म्हणाल्या. महाराष्ट्रातले प्रकल्प दुसऱ्या राज्यात गेले जात आहेत गुंतवणूक होत नाही हा महाराष्ट्रभर मोठा अन्याय होत आहे. यावर महाराष्ट्रांतील ट्रिपल इंजिनचे सरकार गप्प बसले आहे. खोके सरकारकडे २०० आमदार असूनही महाराष्ट्रांवर होणारा या अन्यायावर कोणीही बोलत नाही असे देखील सुप्रिया सुळे म्हणाल्या आहेत. आणि त्यात उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी या गृहमंत्री पदाची जबाबदारी स्वीकारल्यापासून महाराष्ट्रांत चांगलीच गुन्हेगारी वाढली आहे असेही राष्ट्रवादींच्या खासदार सुप्रिया सुळेंनी ट्रिपल इंजिनच्या सरकारवर चांगलाच निशाणा साधला.

एजंटमार्फत घर खरेदी करत असाल तर सावधान! आधी ही महत्वाची माहिती वाचा

दै, जनप्रभात छ.संभाजीनगर जिल्हा प्रतिनिधी ■ मोहन आखाडे

छ.संभाजीनगरः एखाद्या शहरात घर खरेदीसाठी एजंटची मदत नेहमीचं घेतली जाते. आता गल्लोगल्ली शहराशहरात अगदी मोठमोठ्या गृहसंकुल प्रकल्पात अशा एजंटसचा सुळसुळाट पहायला मिळतो. मात्र घर दाखवणार एजंट अधिकृत आहे की नाही याची खात्री करुन घ्या. एजंटची नोंदणी आणि नुतनीकरणासाठी महारेरानं काही नियम आखून दिलेत. १ जानेवारीपासून महारेराच्या प्रमाणपत्राशिवाय प्रॉपर्टी एजंटचा व्यवसाय करता येणार नाही.

महारेराच्या प्रमाणपत्राशिवाय नोंदणी नुतनीकरणही करता येणार नाही. याचं पालन केलं नाही तर कारवाई देखील होणार आहे. सध्याच्या परवानाधारक एजंटसना आणि विकासकांकडील या कामांशी संबंधित कर्मचाऱ्यांनाही १ जानेवारी २०२४ पूर्वीच हे प्रमाणपत्र मिळवून त्यांच्या संकेतस्थळावर अपलोड करणं आवश्यक होतं.

सध्या छत्रपती संभाजीनगर, मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर सारख्या मोठ्या शहरात एजंटचा सुळसुळाट पाहायला मिळत आहे. त्यामुळे ग्राहकांची मोठ्याप्रमाणात आर्थिक फसवणुकीही झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत. मात्र, याला आळा घालण्यालाठी ने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. १ जानेवारी २०२४ पासून परवानाधारक एजंट्स आणि विकासकांकडे काम करणाऱ्या संबंधित कर्मचाऱ्यांना अधिकृत प्रमाणपत्र त्यांच्या संकेतस्थळावर अपलोड करणे बंधनकारक आहे. विकासकांनीही त्यांच्या व्यवहारांसाठी १ जानेवारीनंतर अशाच प्रशिक्षित एजंटसचीच नावे संकेतस्थळावर द्यावी, असे निर्देश देण्यात आले आहे.

नववर्षाचे सेलिब्रेशनःलातूर पोलिसांची कारवाई



दै, जनप्रभात मराठवाडा
उपसंपादक ■ राठोड रामेश पांडित

लातूरः- नववर्षानिमित्त लातूरमध्ये रात्रभर पोलिसांचा चोख बंदोबस्त; मद्यपी चालकांवर कारवाई. कोंबिंग ऑपरेशन व ठिकठिकाणी नाकाबंदीचे करण्यात आली होती. ५२ अधिकारी व ५०० पोलीस अमलदार २०० होमगार्डचा तगडा बंदोबस्त. ठेवण्यात आला होता.नववर्षाचे स्वागत करताना कायद्याचे उल्लंघन करणार्या अनेक मद्यपान करणार्या व्यक्तीवर लातूर पोलिसांनी कारवाई केली.

मावळत्या वर्षाला निरोप अन? नववर्षाचे स्वागत रविवारी (ता.३१) मध्यरात्रीला शहरात जल्लोषात आणि दणक्यात करण्यात आले. रविवारी शहरासह जिल्ह्यात पार्ट्यांची रंगत वाढली.

सरत्या वर्षाला निरोप देताना मद्यसेवनासह नियम मोडणाऱ्यांचा लातूर पोलिसांकडून कार्यवाही करण्यात आली.जागोजागी नाकाबंदी व संपूर्ण जिल्ह्यात कोंबिंग ऑपरेशनचे आयोजन करण्यात आले होते. रात्री उशिरा सुरू झालेली ही तपासणी पहाटेपर्यंत कायम होती.

अतिमद्यसेवन केलेल्या वाहनचालकांना थेट ड्रंक अँड ड्राइव्हच्या केसेस केल्याने अनेकांची नशाच उतरली.

जिल्ह्यात एकूण ४० ठिकाणी नाकाबंदी लावण्यात आली होती.

रविवारी (ता.३१) पहाटेपर्यंत १,६५८ वाहनांची तपासणी करण्यात आली.

७८ मद्यधुंदावस्थेतील वाहनचालकांवर कारवाई केली गेली.

११२४ वाहन चालकावर मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन केल्याप्रकरणी मोटार वाहन कायद्यान्वये खटले दाखल करण्यात आले आहेत.

तसेच ओवर स्पीड चे ५० केसेस करण्यात आले आहेत.

जिल्ह्यातील ७२ हॉटेल व लॉज चेक करण्यात आले.

विविध गुन्ह्यात फरार व पाहिजे असलेल्या ४४ आरोपींना तपासण्यात आले.

दखलपात्र गुन्हा करण्याच्या उद्देशाने दबा धरून बसलेल्या ३ इसमावर कलम १२२ अन्वये कारवाई करण्यात आली.

कोंबिंग ऑपरेशन व नववर्ष बंदोबस्तासाठी लातूर जिल्ह्यातील एकूण १३ वरिष्ठ अधिकारी तसेच ५२ पोलीस अधिकारी ५०० पोलीस अमलदारसह, २०० होमगार्ड, यांचा प्रचंड मोठा बंदोबस्त लावण्यात आला होता. शिवाय स्थानिक गुन्हे शाखा, ११२ डायल, चार्ली मोटरसायकल पेट्रोलिंग, दामिनी पथकची गस्त सुरू होती.

मद्यपी आणि रात्री गोंधळ घालणाऱ्यांना गुन्हे शाखेच्या पथकांनी अटकाव केला. रात्री आठपासून शहरात सर्वत्र नाकाबंदी करण्यात आली.

प्रत्येक चारचाकी आणि संशयित दुचाकीस्वारांची तपासणी करण्यात आली. अतिप्रमाणात मद्यप्राशन केल्याचा संशय आलेल्या व्यक्तीं वर 'ड्रंक अँड ड्राइव्ह'च्या कारवाई करण्यात आली.

पोलीस अधीक्षकाकडून भेटी.

पोलिस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांनी रात्री विविध पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नाकाबंदीच्या पॉइंटवर प्रत्यक्ष भेट देत पाहणी करून मार्गदर्शन व सूचना केल्या. तसेच लातूर पोलिसांनी रात्रभर चोख बंदोबस्त केल्यामुळे कोणत्याही प्रकारचे अनुचित व अप्रिय घटना घडली नसून पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी वारलेस वरून बंदोबस्तावरील सर्व पोलीस अधिकारी व अमलदारांचे कौतुक करून नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या.

महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात बारावी विज्ञान मार्गदर्शन कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

दै, जनप्रभात मराठवाडा
उपसंपादक ■ राठोड रामेश पांडित



लातूरः -महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात दि. २९ व ३० डिसेंबर २०२३ या दोन दिवशी बारावी विज्ञान वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी बारावी बोर्डाची प्रश्नपत्रिका कशी सोडवावी ? याविषयी कार्यशाळा घेण्यात आली.

या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे संचालक अशोक अप्पा उपासे उपस्थित हे होते. यावेळी विचार मंचावर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे आणि कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांना उपस्थितांनी पुष्पहार घालून अभिवादन केले.यावेळी उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे प्रास्ताविक करताना म्हणाले की, विद्यार्थ्यांनी परीक्षेच्या कालावधीमध्ये जास्तीचा ताण-तणाव घेऊ नये. वेळेचा सदुपयोग करावा. सातत्यपूर्ण अभ्यास करावा व जास्तीत जास्त बोर्डाच्या प्रश्नपत्रिका सोडवाव्यात.

या कार्यशाळेत बोलताना महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या जडणघडणीमध्ये आई-वडिलांबरोबर शिक्षकांचा फार मोठा सहभाग असतो. सर्व विद्यार्थ्यांनी अभ्यासाचे नियोजन करावे व नियोजनाप्रमाणे अभ्यास करून गुणवत्तेचा आलेख चढत्या क्रमाने ठेवावा.

अध्यक्षीय समारोप करताना अशोक आप्पा उपासे म्हणाले की, विद्यार्थ्यांचा गुणवत्ता विकास होण्यासाठी अशा कार्यशाळेचे आयोजन होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांनी गुणात्मक विकास करून स्वतःचा, आई-वडिलांचा, महाविद्यालयाचा व संस्थेचा नाव लौकिक करावा असे प्रतिपादन त्यांनी केले.

या कार्यशाळेत प्रा. सूर्यवंशी के. आर.(गणित), डॉ. गुणवंत बिरादार (पशुविज्ञान व तंत्रज्ञान), प्रा. आनंद खरपडे (डेरी सायन्स), प्रा. पटने वाय. बी. (क्रॉप सायन्स). डॉ. टी. घनःश्याम (हिंदी), प्रा. सोनोने रवींद्र (पाली), प्रा. दुडीले व्यंकट (मराठी), प्रा. पाटील व्ही. सी. (भौतिकशास्त्र), प्रा. पांढरे जी. एल. (रसायनशास्त्र), प्रा. पानगावे संगमेश्वर (वनस्पतीशास्त्र)., प्रा. माळी श्रीकांत (प्राणीशास्त्र), प्रा. सुप्रिया बिराजदार (इलेक्ट्रॉनिक्स), प्रा. लखादिवे संपदा (इंग्रजी) यांनी विद्यार्थ्यांना सखोल व अभ्यासपूर्ण मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे दिल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.या कार्यशाळेत बारावी विज्ञान वर्गातील एकूण साडेतीनशे विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपप्राचार्य प्रा. संजय पवार यांनी केले व आभार कार्यालयीन प्रमुख नामदेव बेंदरगे यांनी मानले.या कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी सुरेश येरुळे, जगन्नाथ येंचवाड, संतोष येंचवाड, रघु शिंदे केशव घंटे, अशोक शिंदे, गोपाळ तिरमले, शुभम बिरादार, राजाभाऊ बोडके, लोंढे मावशी, सय्यद जलील यांनी परिश्रम घेतले.

आमदार राजू नवघरे यांनी आढावा बैठकीत अधिकारी व कर्मचारी यांना चांगलेच धरले धारेवर





रोजगार हमी योजनेअंतर्गत योजनांचा आढावा घेताना काय झाले?
रोजगार हमी योजने अंतर्गत सार्वजनिक विहिरी , वैयक्तिक विहिरी , जनावराचे गोठे याविषयी माहिती घेत असताना अनेक लाभार्थी व सरपंच यांच्याकडून अधिकारी व कर्मचारी हे पैशाची मागणी करत असल्याची माहिती समोर आली आहे यामध्ये गटविकास अधिकारी हे चांगले असल्याचे सरपंचाकडून सांगण्यात येत असले तरी त्यांच्या हाताखालचे काम करणारे पैसे मागत असल्याचे समोर आले , त्यावर आमदार राजु नवघरे यांनी तुम्हाला हाताखालचे कर्मचारी ऐकत नाहीत का ? तुम्ही काय करता ? असा प्रश्न विचारला असता त्यावर बिडिओ यांनी उठून कोणताही कर्मचारी पैसे मागत असल्यास अँटीकरप्शन विभागाशी संपर्क साधावा व मी देखील कर्मचाऱ्यांची मीटिंग घेऊन समज देईल असे सांगण्यात आले.आमदार एवढ्यावरच थांबले नाहीत तर जे पैसे मागणारा अधिकारी म्हणून सरपंचाकडून सांगण्यात येत होते तो सहाय्यक बिडिओ सुनील अंभुरे यांना भर बैठकीतूनच फोन केला आणि अनेक सरपंचाकडे पैशाची मागणी करत आहात असे विचारले असता मी तुम्हाला आल्यावर भेटतो असे अंभुरे यांच्याकडून उत्तर मिळाले त्यावर आमदार संतापाने म्हणाले मला मॅनेज करता का काय ? त्यावर मात्र सभागृहात एकच अशा पिकला ! त्यावर गटविकास अधिकारी यांना फसवू नका, काम चांगले करा कोणाचे काम पेंडिंग राहता कामा नये अशी सूचनांची तंबी देऊन फोन ठेवला . या बैठकीमध्ये लाभार्थी , अनेक गावचे सरपंच व अनेक प्रशासकीय विभागाचे अधिकारी , कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते . अनेकांच्या समस्या ऐकून त्यावर संबंधित अधिकारी यांना तोडगा काढण्याचा व काम लवकरात लवकर करण्याचा आवर्जून आमदार राजु नवघरे यांच्याकडून सूचना देण्यात आल्या आहेत.

हिंगोली ■ रुपेश एंगडे

दिनांक २९ डिसेंबर रोजी तहसिल कार्यालयातील सभागृहात वसमत विधानसभेचे आमदार राजू नवघरे यांनी अनेक विभागाच्या प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी यांची चालू असलेल्या कामकाजाविषयी व बंद असलेल्या कामकाजाविषयी आढावा बैठक आयोजित करण्यात आले होती. या बैठकीला उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ , तहसीलदार मॅडम शारदा दळवी वसमतचे गटविकास अधिकारी उमाकांत तोटावाड औंढा येथिल गटविकास अधिकारी बालाजी गोरे हे प्रामुख्याने उपस्थित होते . या आढावा बैठकीमध्ये पंचायत समितीमधील रोजगार हमी योजनाच्या कामाविषयी , शिक्षण विभागातील कामाविषयी , घरकुल विभागातील कामकाजाविषयी व महिला बालकल्याण विकास विभागातील कामाविषयी तसेच जिल्हा परिषद अंतर्गत उपजिल्हा परिषद बांधकाम विभाग , ग्रामीण पाणी पुरवठा विभाग , जलसंपदा विभाग तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग , मुख्यमंत्री सडक योजना विभाग , विद्युत वितरण महामंडळ अशा विविध प्रशासकीय विभागातील कामकाजाचा अढावा घेऊन अधिकारी व कर्मचारी या आढावा बैठकीत अवर्जुन उपस्थित होते.सार्वजनिक बांधकाम उपविभागातील उप अभियंता , उपजिल्हा परिषद बांधकाम विभागातील उपअभियंता , जलसंपदा विभागातील अभियंता यांच्याकडून चालू असलेल्या कामाविषयी व रखडलेल्या कामाविषयी माहिती घेऊन अडचणी विचारून कामे होईल तेवढे लवकर करण्याच्या सूचना आमदार यांच्याकडून देण्यात आल्या आहेत.

ग्रामिण पाणी पुरवठा विभागाच्या मुख्य अभियंता मॅडमकडून माहिती घेताना त्यांच्या हाताखाली काम करणारे उप अभियंता बारीखान व शाखा अभियंता कोकडवार हे सरपंचांना पैशाचे डिमांड करत असून त्यांना समज देऊन दर्जेदार काम करण्यासाठी सूचना करण्यात याव्यात अशी मागणी करून साहेबांनी तालुक्यातील सर्व पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी यांची आढावा बैठक घेऊन या सर्व अवेध धंद्यावर नियंत्रण आणण्याचे आवश्यकता आहे .

आमदार साहेबांनी पोलीस अधिकारी यांचीही आढावा बैठक घेण्याची आवश्यकता ?

हिंगोली ■ रुपेश एंगडे

आमदार राजू नवघरे यांनी २९ डिसेंबर रोजी अनेक प्रशासकीय अधिकारी यांची आढावा बैठक घेऊन जे अधिकारी कामाप्रती निष्क्रिय आहेत त्यांना चांगलेच खडे बोल सुनावले आहेत . परंतु सदरच्या बैठकीला पोलीस प्रशासनातील अधिकारी यांना बोलावायला पाहिजे होते . कारण समाज घटकावर परिणाम करणारा महत्त्वाचा घटक म्हणून पोलीस प्रशासनाकडे पाहिले जाते , सध्याचे परिस्थितीत शहरासह ग्रामीण भागातही अवैध धंदे मोठ्या प्रमाणात फैलावले आहेत . म्हणुन आमदार साहेबांनी तालुक्यातील सर्व पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी यांची आढावा बैठक घेऊन या सर्व अवेध धंद्यावर नियंत्रण आणण्याचे आवश्यकता आहे .

हिंगणघाटात राज्यातील पहिल्या 'स्मार्ट कॅफे टॉयलेट'ची निर्मिती

वर्धा ■ प्रतिनिधी

नावीन्यपूर्ण योजनेतून हिंगणघाट नगरपरिषदेने राज्यात पहिल्यांदाचा 'स्मार्ट कॅफे टॉयलेट'ची निर्मिती केली आहे. केवळ १० लाख रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या या टॉयलेटची दखल केंद्र व राज्य शासनाने घेतली आहे. दुहेरी उद्देशाने आणि अतिशय सुंदरपणे बांधलेल्या या टॉयलेटचे सर्वत्र कौतूक होत आहे.

स्वच्छ आणि सुंदर शहर या संकल्पनेला अनुसरून राज्यात प्रथमच स्वच्छ, सुंदर आणि आकर्षक अशा स्मार्ट कॅफे टॉयलेटची निर्मिती नगर परिषदेद्वारा करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी नावीन्यपूर्ण योजनेतून यासाठी १० लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला. हिंगणघाट शहरातील छत्रपती शिवाजी महाराज उद्यान येथील निसर्गमय परिसरात अगदी २०० स्केअर फूट इतक्या कमी



केवळ १० लाखात केली निर्मिती; केंद्र व राज्य शासनाकडून दखल ; व्यवस्थापन बचतगटाच्या महिलांकडे

जागेत हे टॉयलेट स्थापित करण्यात आले आहे.

यामध्ये एक कॅफे, पुरुष व महिलांकरिता प्रत्येकी २ पाश्चात्य पद्धतीचे शौचालय, पुरुषांकरीता करिता १ मुत्रीघर, वॉश बेसिन तसेच महिलांकरिता सेनीटरी वेंडींग मशीन या प्रकारच्या अत्याधूनिक सर्व सोयी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. समोरील दर्शनीय भागात कॅफे देण्यात आलेला आहे. त्यामध्ये नागरिकांना स्वास्थवर्धक व आरोग्यदायी अंकुरित कडधान्य व ताज्या फळांचे ज्यूस उपलब्ध करून देण्यात येतील.

या स्मार्ट कॅफेचे व्यवस्थापन हिंगणघाट शहरातील बचतगटाच्या महिलांना देण्यात आले असून या माध्यमातून त्यांना रोजगार उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. नागरिकांना टॉयलेटच्या टेरेसवर उपलब्ध असलेल्या आसनावर बसून ज्यूस पिण्याचा आनंद घेता येणार आहे. या स्मार्ट कॅफे टॉयलेटची दखल केंद्र व राज्य शासनाने घेतली असून शासनाच्या अधिकृत सोशल मीडिया माध्यमातून या उपक्रमाला प्रसिध्दी देण्यात आली आहे. स्मार्ट कॅफे टॉयलेटच्या निर्मितीसाठी नगर परिषदेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी हर्षल गायकवाड, नगर अभियंता श्री.पटेल, कनिष्ठ अभियंता श्री.अली यांनी विशेष सहकार्य केले.

महाराष्ट्रातील डिजिटल मिडिया परिषदेच्या सर्वांनी माहूर मेळाव्यात सहभागी व्हावे : राज्य कार्याध्यक्ष अनिल वाघमारे

बीड ■ गितांजली लव्हाळे

'मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने देण्यात येणारे वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघ आणि रंगा अण्णा वैद्य आदर्श जिल्हा पत्रकार संघ पुरस्कारांचे वितरण सोहळा येत्या १३ जानेवारी २०२४ रोजी नांदेड जिल्ह्यातील माहूर येथे होणार आहे. या पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी राज्याच्या विविध भागातून मोठ्या संख्येने पत्रकार येणार आहेत. महाराष्ट्र राज्यातील डिजिटल मिडिया परिषदेच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांनी या मेळाव्याला उपस्थित राहावे असे आवाहन मराठी पत्रकार परिषदेच्या डिजिटल मिडिया परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष अनिल वाघमारे यांनी केले आहे.

मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने दरवर्षी परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख, विश्वस्त किरण नाईक अध्यक्ष शरद पाबळे, कार्याध्यक्ष मिलिंद अष्टीवकर ,सरचिटणीस मन्सूर भाई,कोषाध्यक्ष विजय जोशी या सर्वांच्या प्रमुख उपस्थितीत आणि काही खास पाहुण्यांच्या उपस्थितीत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या जिल्हा आणि तालुका पत्रकार संघांना पुरस्कार देऊन राज्यपातळीवर त्यांचा गौरव केला जातो. या वर्षी नांदेड जिल्ह्यातील माहूर येथे १३ जानेवारी २०२४ रोजी एका शानदार सोहळ्यात हे पुरस्कार वितरित केले जाणार आहेत.या वर्षीच्या पुरस्कारांचे मानकरी रंगाअण्णा वैद्य आदर्श जिल्हा पत्रकार संघ पुरस्कार यंदा उत्तर नगर आणि दक्षिण नगर जिल्ह्यांना विभागून देण्यात आला आहे.



वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघ पुरस्कार १) मराठवाडा विभाग : माजलगाव तालुका पत्रकार संघ, जिल्हा बीड २) लातूर विभाग : माहूर तालुका पत्रकार संघ, जिल्हा नांदेड ३) नाशिक विभाग : साक्री तालुका मराठी पत्रकार संघ, जिल्हा धुळे ४) पुणे विभाग : शिरूर तालुका मराठी पत्रकार संघ, जिल्हा पुणे ५) अमरावती विभाग : तेल्हारा तालुका पत्रकार संघ, जिल्हा अकोला ६) कोल्हापूर विभाग : बत्तीस शिराळा तालुका पत्रकार संघ, जिल्हा सांगली ७) नागपूर विभाग : आर्वी तालुका पत्रकार संघ, जिल्हा वर्धा ८) कोकण विभाग : अंबरनाथ तालुका पत्रकार संघ, जिल्हा ठाणे.या सर्व पत्रकार संघांना पुरस्कार प्रदान करुन गौरविण्यात येणार आहे. या अभुतपुर्व सोहळ्यात महाराष्ट्र राज्यातील डिजिटल मिडिया परिषदेचे बीड,सांगली,सातारा,रत्नागिरी,अहमदनगर,बुलढाणा,नांदेड,लातुर, पुणे,गडचिरोली,सिंधुदुर्ग, सोलापूर,कोल्हापूर,मुंबई, छत्रपती संभाजीनगर,परभणी,हिंगोली,नाशिक,धुळे,रायगड,जालना,वाशिम,भंडारा या सह आदी जिल्ह्यातील डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हाध्यक्ष व पदाधिकाऱ्यांनी या सोहळ्याला उपस्थित राहावे असे आवाहनही राज्य कार्याध्यक्ष अनिल वाघमारे यांनी केले आहे.

मातोश्री वृध्दाश्रमात क्षयरोग दुरिकरण कार्यक्रम शिबिर



वर्धा ■ प्रतिनिधी

जिल्हा क्षयरोग केंद्र व आयसीएमआरच्या संयुक्त विद्यमाने मातोश्री वृध्दाश्रम येथे जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा क्षयरोग अधिकारी व आसीएमआरचे वैद्यकीय अधिकारी यांच्या मार्गदर्शनात राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रम शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी मातृसेवा संघ मातोश्री वृध्दाश्रमाच्या अध्यक्ष पुष्पमाला देशमुख, जिल्हा क्षयरोग अधिकारी ए.एस. खोब्रागडे, जिल्हा क्षयरोग केंद्राचे डॉ. हेमंत पाटील, आरोग्य सहाय्यक सुमंत ढोबळे, जिल्हा कार्यक्रम समन्वयक संजू सोनटक्के, साधना कोसारे, वैभव मेघरे, आयसीएमआरचे डॉ.आरविंद प्रधान, सोनू नागवंशी, सतिश राऊत, मातोश्री वृध्दाश्रमाचे कर्मचारी उपस्थित होते.

क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम शिबिरात संशयित क्षयरुग्णांची तपासणी तसेच हॅन्ड डिजीटल एक्स-रे मशीनद्वारे वृध्दाचे डिजिटल एक्स-रे तपासणी करण्यात आली. कार्यक्रमादरम्यान क्षयरोगाबाबत लाभार्थ्यांना माहिती, लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाय, निदान झाल्यानंतर दिले जाणारे उपचार याबाबत माहिती देण्यात आली. या सर्व आजाराचे उपचार जिल्हा सामान्य रुग्णालयात मोफत दिले जाणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले, असे जिल्हा क्षयरोग अधिकारी यांनी कळविले आहे.

शाश्वत पर्यावरण विकास परिषदेला राज्यपाल रमेश बैस यांचे पाठबळ

दै, जनप्रभात मराठवाडा उपसंपादक ■ राठोड रामेश पांडित

मुंबईः राज्याच्या पर्यावरण शेती आणि धोरणात्मक दिशेमध्ये परिवर्तन करण्यासाठी आयोजित केलेल्या शाश्वत पर्यावरण विकास परिषदेला आता राज्याचे राज्यपाल महामहीम रमेश बैस देखील उपस्थित राहणार आहेत. केंद्रीय मंत्री म्हणून बांबू लागवड आणि उद्योगातील त्यांच्या अनुभवांचे या परिषदेमध्ये सादरीकरण होणार आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग महाराष्ट्र शासन आणि लातूर जिल्ह्यातील फिनिक्स फाऊंडेशन संस्थेच्या सहकार्याने मुंबईत दि. ९ जानेवारी, २०२४ रोजी 'शाश्वत पर्यावरण विकास' परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. देशातील राज्यातील आणि



जगभरातील तज्ञ या परिषदेमध्ये सहभागी होणार आहेत.आयोजकांच्या माध्यमातून या परिषदेचे निमंत्रण देण्यासाठी काल (ता.२९)मुंबईतील राजभवन या ठिकाणी महामहीम राज्यपाल रमेश बैस प्रदीर्घ भेट घेण्यात आली.

यावेळी राज्यपाल महोदयांनी ९ जानेवारी २०२४ रोजी मुंबईत होणाऱ्या आमच्या आगामी पर्यावरणीय शाश्वतता शिखर परिषदेला उपस्थित राहण्यासाठी सहमती दर्शवली.त्याच बरोबर श्री बैस यांनी भारत सरकारच्या केंद्रीय पर्यावरण आणि वन मंत्रालयात राज्यमंत्री म्हणून त्यांच्या समृद्ध अनुभवाच्या आधारे मौल्यवान अंतर्दृष्टी दिली. फिनिक्स फाउंडेशन आयोजित या परिषदेचे आमंत्रण स्वीकारल्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. ९ जानेवारीच्या कार्यक्रमाची शोभा वाढवणार आहेत, त्यांच्या बहुमोल मार्गदर्शनासह एका सत्राचे अध्यक्षस्थान स्वीकारतील असे राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी सांगितले.

राज्याच्या पातळीवर मनरेगा योजनेतून बांबू लागवडीसाठी प्रोत्साहन योजना आणि अंमलबजावणी दोन शेतकऱ्यांच्या उत्पन्न वाढीत योगदान देणारे मनरेगा मिशनचे महासंचालक नंदकुमार देखील उपस्थित होते. राज्यपालां सोबत झालेल्या बैठकीमध्ये कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, शराजेंद्र शहाडे (क्यूसीओ कम एसई, मनरेगा),कृणाल नेगांधी (संमेलनचे आयोजन सचिव आणि एमडी जंस बांबू), मुकेश गुलाटी (कार्यकारी संचालक, एमएसएमई फाउंडेशन) आणि संजीव करपे (संचालक, कॉन्बॅक) हे मान्यवर उपस्थित होते.

महामहीम राज्यपाल रमेश बैस आणि ,(घड्याळाच्या दिशेने बसलेले) श्री नंदकुमार (महासंचालक, मनरेगा), श्री राजेंद्र शहाडे (गुणवत्ता नियंत्रण अधिकारी, मनरेगा), श्री कृणाल नेगांधी (संमेलनचे आयोजन समिती, सचिव आणि कार्यकारी संचालक, जाँस बांबू), श्री मुकेश गुलाटी (कार्यकारी संचालक, एमएसएमई फाउंडेशन) आणि श्री संजीव कर्पे (संचालक, कॉन्बॅक) आदी मान्यवर उपस्थित होते.

ग्रामसेवक, आरोग्य कर्मचाऱ्यांचे कामकाज ऑनलाईन दिसणार ; झेडपी सिईओ मनीषा आव्हाळे यांचे काय आहेत नववर्षाचे संकल्प

दै, जनप्रभात मराठवाडा उपसंपादक ■ राठोड रामेश पांडित

सोलापूरः- जिल्हा परिषदेचे सर्व ग्रामसेवक, आरोग्य यंत्रणेतील सर्व कर्मचारी यांचे कामकाज ऑनलाइन दिसेल असा ॲप आम्ही तयार करत आहोत. त्या त्याबाबत ग्रामसेवक तसेच आरोग्य कर्मचारी संघटनेची चर्चा करून हा ?प विकसित करण्यात येणार आहे अशी माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांनी दिली.

ग्रामसेवक गावामध्ये किती वेळ राहतो ? आरोग्य कर्मचारी प्राथमिक आरोग्य केंद्रात किती वेळा असतात ? असे प्रश्न वारंवार उपस्थित होतात त्यासाठी आता





जिल्हा परिषद ?प विकसित करत असून ठराविक रेंजमध्ये जेव्हा ग्रामसेवक आणि आरोग्य कर्मचारी आल्यास त्या ?पमध्ये त्यांच्या कामकाजाची माहिती कळेल. ते आपल्या कामकाजाची माहिती त्या ?पमध्ये नोंद करू शकतील असे आव्हाळे म्हणाल्या.

नुकत्याच झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत जिल्हा परिषदेचा आरोग्य विभाग सोडून इतर कोणत्याही विभागावर प्रश्न उपस्थित झाले नाहीत. हेच आमच्या मागील सहा महिन्याच्या कामकाजाचे यश आहे. जलजीवन मिशनचे कामकाज सुरळीत चालू आहे. महामार्गात गेलेल्या जिल्हा परिषदेच्या शाळा त्याचाही प्रश्न बऱ्यापैकी मिटला आहे, हद्दवाढ भागातील जिल्हा परिषदेच्या शाळांचा दुरुस्तीचा प्रस्ताव पाठवला आहे असे सांगून येणाऱ्या नवीन वर्षामध्ये ग्रामपंचायत, आरोग्य आणि शिक्षण या तीन विभागावर लक्ष केंद्रित करण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला.

या वर्षात उमेद अभियान अंतर्गत असलेल्या बचत गटांच्या उत्पादनांना ऑनलाइन मार्केट मिळवून देण्याचा प्रयत्न आहे. त्यासाठी सोलापुरातील डॉक्टर आंबेडकर चौकात असलेल्या नेहरू वसतिगृहाचे दोन गाळे बचत गटाच्या वस्तू विक्रीसाठी देण्यात येणार आहेत. त्याची ऑनलाईन विक्री होण्यासाठी ॲमेझॉन, फ्लिपकार्ड अशा ऑनलाइन शॉपिंग ॲप्सशी कनेक्ट करण्याचे प्रयत्न सुरू आहेत अशी ही माहिती आव्हाळे यांनी दिली.

फेब्रुवारी महिन्यात जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या क्रीडा स्पर्धा घेण्यात येतील, त्याचबरोबर कर्मचाऱ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात येईल असेही त्या म्हणाल्या.

आदिवासी कोळी महादेव समाजाचे प्रलंबित असलेले जात प्रमाणपत्र तात्काळ द्या अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल : पवनकुमार भोपळे

दै, जनप्रभात मराठवाडा उपसंपादक ■ राठोड रामेश पांडित

चाकूरः-अनेक दिवसांपासून आदिवासी कोळी महादेव समाजाच्या विद्यार्थी व विद्यार्थीनी यांनी आपल्या कार्यालयात जात प्रमाणपत्र मिळवण्यासाठी संचिका दाखल केल्या आहेत.त्या संचिका प्रलंबित असल्याने आदिवासी कोळी समाजाच्या विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्रा पासून वंचित रहावे लागत आहे त्यामुळे त्यांच शैक्षणिक नुकसान होत आहे तरी उपविभागीय अधिकारी यांनी आम्हाला कोणत्याही प्रकारच्या अटी शर्ती न लावता तात्काळ जातीचे प्रमाणपत्र द्यावे अशी मागणी चाकुर येथील तहसीलदार यांच्या मार्फत राज्याचे मुख्यमंत्री सन्माननीय एकनाथ शिंदे यांना यांच्याकडे करण्यात आली आहे.



मागण्या मान्य न झाल्यास लोकशाही मार्गाने आझाद आदिवासी कोळी सामाजिक संघटना महाराष्ट्र राज्य च्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा चाकुर तालुकाध्यक्ष पवनकुमार भोपळे यांनी दिला आहे.

जनप्रभात हे दैनिक पत्र मालक, प्रकाशक, मुद्रक : संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर, नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय, नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९ (या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक, मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNI NO : MAHMAR/2022/82242